


। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २९७ वा । गुरूवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)  कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# पुण्यातील किल्ले अतिक्रमणमुक्त
# २०३० ला ४०० वी शिवजयंती भव्य करु

## शिवनेरीवरून फडणवीसांची घोषणा; अजितदादांचीही आठवण

**पुणे/प्रतिनिधी** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जन्मोत्सवानिमित्त किल्ले शिवनेरी येथे भव्य सोहळा पार पडला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित करत शिवरायांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी आपल्या भाषणात इतिहास, स्वराज्याची संकल्पना आणि किल्ल्यांच्या जतनाबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. शिवजन्मभूमीवर बोलताना त्यांनी शिवरायांच्या कार्याचा अभिमान व्यक्त केला आणि भविष्यातील नियोजनाची दिशा मांडली.

फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज नसते तर भारताचा इतिहास आणि भूगोल यांचे चित्र वेगळे असते. ज्या काळात अनेक राजे मोघलांच्या अधिपत्याखाली काम करत होते, त्या काळात आई जिजाऊंनी शिवरायांना घडवले. त्यांनी शिवरायांना हिंदुस्थानाला मोघलांच्या जोखडातून मुक्त करण्याची आणि रयतेचे राज्य स्थापन करण्याची प्रेरणा दिली. अठरा पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून उभी केलेली फौज ही स्वराज्याची ताकद ठरली. शिवरायांनी हे राज्य माझे नसून रयतेचे आहे, असे सांगत देव, देश आणि धर्मासाठी लढण्याची शिकवण दिली, असे त्यांनी नमूद केले.





मुख्यमंत्र्यांनी शिवरायांच्या दूरदृष्टीवरही प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, समुद्रमार्गे शत्रू येऊ शकतो, हे ओळखणारे शिवाजी महाराज हे पहिले राजे होते. त्यामुळे पश्चिम किनाऱ्याचे रक्षण करण्यासाठी जलदुर्ग उभारण्याचे काम त्यांनी हाती घेतले. पोर्तुगीजांचा पराभव केल्यानंतर त्यांच्या कारकिर्दीत कोणत्याही आक्रमकाला समुद्रमार्गे येण्याची हिंमत झाली नाही, असे फडणवीस यांनी सांगितले. शिवरायांचे हे नियोजन आणि धाडस आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी त्यांनी ऐतिहासिक किल्ल्यांच्या जतनाबाबत महत्त्वाची माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामनिर्देशित करण्यात आले असून जगातील २७ देशांनी त्यास एकमताने मान्यता दिली, याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. हा सन्मान केवळ महाराष्ट्राचा नव्हे तर संपूर्ण देशाचा गौरव आहे, असे ते म्हणाले. शिवरायांचा वारसा जगासमोर नेण्याचा हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अजित पवार यांचा उल्लेख करत फडणवीस म्हणाले की, अजितदादांना शिवनेरी किल्ल्याबद्दल प्रचंड प्रेम होते. काही काळापूर्वी महाराष्ट्रातील शिवरायांचे सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू असून पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले आता अतिक्रमणमुक्त झाले आहेत, असे त्यांनी जाहीर केले. एकाही किल्ल्यावर आता अतिक्रमण नाही, असे सांगताना त्यांनी समाधान व्यक्त केले. हा निर्णय अजितदादांच्या इच्छेनुसार पूर्ण झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

शिवरायांच्या कार्याचा वारसा जपण्याची जबाबदारी आपली आहे, असे सांगत फडणवीस यांनी पुढील नियोजनाची झलकही दिली. २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि दिव्य स्वरूपात साजरी करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. त्या निमित्ताने राज्यभर विविध उपक्रम राबवले जातील, असेही त्यांनी सांगितले. शिवनेरीवरून दिलेल्या या घोषणेमुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

शिवजन्मभूमीवर झालेल्या या सोहळ्यात इतिहासाची आठवण आणि भविष्यातील संकल्प यांचा संगम दिसून आला. शिवरायांचे विचार, स्वराज्याची प्रेरणा आणि किल्ल्यांचे संवर्धन यावर भर देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या बांधिलकीचा पुनरुच्चार केला. शिवनेरीवरून दिलेला हा संदेश केवळ भाषणापुरता मर्यादित न राहता कृतीतूनही दिसेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### अजितदादांना किल्ले शिवनेरीबद्दल विशेष जिव्हाळा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवजयंतीनिमित्त बोलताना सांगितले की, अजितदादांना किल्ले शिवनेरीबद्दल विशेष जिव्हाळा होता. यापूर्वीच राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याची घोषणा केली होती. त्या निर्णयानुसार काम सुरू असून पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्यात यश आले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. शिवरायांचा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी आणि गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण



**लातूर/प्रतिनिधी** : शिवजयंतीनिमित्त जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झालेल्या या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सर्व उपस्थितांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

## सिध्देश्वर कोलेज ऑफ फार्मसीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी** : सिध्देश्वर कोलेज ऑफ फार्मसीत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक रयतेचे राजे शौर्य धैर्य आणि न्यायाचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि ती मी मिळवणारच त्यांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि आदर्श राज्यकारभारातून आपण प्रेरणा घेऊ या.

धर्मनिसेक्षता स्त्रीसन्मान शौर्य याणि स्वाभिमान यांची शिकवण देणारे' शिवरायांचे विचार जीवणात रुजवूया. जय शिवराय. जय शिवाजी. अशी माहिती आयुष गुंजरगे यांनी सांगितली. तसेच नवीन चव्हाण याने शिवाजी महाराजांचा पोवाडा गायिका. अशा प्रकारे महाविद्यालयात शिव जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ शामलीला बावगे मॅडम, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.




छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत खा.डॉ. शिवाजी काळगे ,महापौर जयश्री सोनकांबळे ,लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड.किरण जाधव ,उपमहापौर ॲड.स्नेहल उटगे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराजांना मानवंदना देण्यात आली. यावेळी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रभात किरणे

तंदुरुस्त नाही
तन,काय करेल धन?
निद्रानाश,निशा करी बेचैन
मन जीवन जगणे बा असे
अपुल्या हाती पुन्हा पुन्हा
आठवावे,अति तिथे माती
– इंजि. नागनाथ
कलवले, लातूर

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्यसभेच्या ३७ रिक्त जागेसाठी १६ मार्चला निवडणूक...

## चिमटा दयाचा



लातूर ही शिक्षणाची
पंढरी आहे !
यात कोयता गँग
गाजत आहे !
बुध्दीवंताने पुढे येवून
मार्गदर्शनाची गरज आहे!

## इयत्ता दहावीच्या परीक्षांना शुक्रवारपासून सुरुवात

### कॉपीमुक्त परीक्षेसाठी प्रशासनाकडून उपाययोजना


**लातूर/प्रतिनिधी** : जिल्ह्यात शुक्रवार पासून इयत्ता दहावीच्या परीक्षेस प्रारंभ होत असून कॉपीमुक्त परीक्षेसाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. परीक्षा केंद्रावर अचानकपणे भेट देण्यासाठी भरारी पथकाची व कायमस्वरूपी बैठे पथकाची व्यवस्था करण्यात आली असून, कॉपी मुक्त वातावरणात परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने आवश्यक दक्षता घेतली आहे. जिल्ह्यातील १५२ परीक्षा केंद्रावर २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या काळात इयत्ता दहावीची परीक्षा होणार आहे. लातूर जिल्ह्यातून ३९ हजार २४२ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. प्रत्येक विषयाच्या पेपरसाठी १५२ केंद्रासाठी महसूल विभाग, ग्रामविकास विभाग आणि इतर विभागांच्या समन्वयातून १५२ त्रिसदस्यीय बैठी पथके गठीत करण्यात आली आहेत, ती रोटेशन पद्धतीने कार्यान्वित ठेवण्यात येणार आहेत. ही पथके पूर्ण वेळ कार्यरत राहणार आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेली महसूल अधिकारी, जिल्ह्यातील सर्व खातेप्रमुख यांची ७० भरारी पथके परीक्षा कालावधीत विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेट देवून पाहणी करतील. परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्रावर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आलेले आहेत.

## बाभळगाव महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी** :दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. संदिपान चेवले यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रा.शिल्पा हलसीकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे होते.



प्रा. हलसीकर यांनी मार्गदर्शन करताना असे म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते उत्कृष्ट प्रशासक, लोककल्याणाचा ध्यास घेतलेले दूरदृष्टीचे नेतृत्व होते. त्यांनी स्वराज्य उभारताना न्याय, समानता आणि शिस्त या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले. आजच्या विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनातून आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम आणि समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा घ्यावी. शिक्षणाच्या बळावर स्वतःचा आणि देशाचा विकास साधणे, हाच शिवविचार खऱ्या अर्थाने जपण्याचा मार्ग आहे. अध्यक्ष समारोपामध्ये प्राचार्यांनी आपल्या मनोगतात छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्वगुण, प्रशासनकौशल्य आणि आदर्श मूल्ये आजच्या तरुणाईसाठी मार्गदर्शक असल्याचे नमूद केले. स्वराज्याचा विचार हा केवळ इतिहास नसून तो जबाबदारीची जाणीव करून देणारा विचार आहे, असे त्यांनी सांगितले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग मुंढे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या शिवजयंतीच्या निमित्ताने प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




कोठेही व केंव्हाही वाचा latursamachar.com वर   कोठेही व केंव्हाही वाचा latursamachar.com वर   कोठेही वकेंव्हाही वाचा latursamachar.com वर


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## शिवाजी महाराजांच्या विचाराची गरज

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सर्वत्र आंनदाने साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराज जर जन्माला आले नसते तर भारतीय संस्कृती राहीली नसती. हिंदू,मराठी भाषा समाप्त झाली असती. ब्रिटिश साम्राज्यशाहीविरोधात समर्थ आणि सक्षमपणे लढा देत असताना समस्त क्रांतिकारकांच्या समोर आदर्श होता, तो सतराव्या शतकात एक सामर्थ्यसंपन्न हिंदू राजसत्ता पाच इस्लामी राजसत्तांना टक्कर देऊन निर्माण केली त्या शिवछत्रपतींचा. १६३० ते १६८० या अवघ्या ५० वर्षांच्या आयुष्यात कणाहीन, प्रचंड भेदरलेल्या व आत्मविश्वास गमावलेल्या स्वकियात शिवछत्रपतींनी स्वाभिमान निर्माण करून त्यांना संघर्षासाठी सिद्ध केले. कणाहीन पराभूत मनोवृत्तीच्या समाजात प्राण भरून त्यांच्यात शिवरायांनी आत्मतेज निर्माण केले. अठरापगड जातीच्या मावळ्यांना योग्य दिशा देऊन त्यांच्या रोमारोमांत स्वराज्यप्रेम निर्माण केले, त्या अथक प्रयत्नांतून हिंदवी स्वराज्य निर्माण झाले. त्याची इतिहासकारांना जागतिक पातळीवर नोंद घ्यावी लागली. जगावर राज्य करणाऱ्या बलाढ्य शक्तीसाठी छत्रपती शिवाजी महाराज एक कोडे होते. हे विराट कार्य करीत असताना आपल्या जीवनातला प्रत्येक क्षण अत्यंत कौशल्याने वापरून तत्कालीन सामान्य माणूस त्यांनी संस्कारित केलाच, पण भावी पिढ्यांसाठी दिशादर्शक नियोजनाचे भांडारच उपलब्ध केले. महाराजांचा इहलोकाचा प्रवास संपून ३४२ वर्षे झाली. पण आजही फक्त त्यांच्या नावाचा उच्चार जरी केला, तरी प्रत्येक मराठी माणसाच्या अंगात वीरश्री निर्माण होते. यानंतरही हजारो वर्षे ही अनुभूती प्रत्येक मराठी माणसाला येत राहणार. हे वास्तव कुणीही नाकारू शकत नाही. स्वातंत्र्यलढा देताना शिवचरित्राचे पारायण करून त्यांच्या यशाचे रहस्य जाणून घेणे क्रांतिकारकांना गरजेचे वाटत होते. अन्यायी व अत्याचारी ब्रिटिश साम्राज्यशाहीविषयी त्यांच्या मनात चीड निर्माण झाली होती. शिवछत्रपतींच्या न्याय-नीती व धर्मावर आधारित असलेल्या स्वराज्याविषयी त्यांच्या मनात आकर्षण व आपुलकी होती. ब्रिटिश राजवट अहिंसेने संपविता येणारच नाही. त्यासाठी साम, दाम, दंड व भेद या एकत्रित मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे, याची खात्री त्यांना पटली होती. सत्य आणि धर्म दोन्ही संकल्पना अमूर्त आहेत. त्याचे रक्षण शस्त्रबलाने व बाहुबलाने केले, तरच शत्रूला धाक निर्माण होतो. पराक्रमाचा इतिहास जर भावी पिढ्यांच्या समोर असला तरच पराक्रमी पिढ्या निर्माण होतील. नसता भेकडांचा जमाव संकट येताच शेपूट घालून लपून राहण्यासाठी सुरक्षित बिळ शोधत असतो व शत्रूच्या हाती लागल्यावर शेळ्यामेंढ्यांसारखा कापला जातो किंवा चामडी वाचविण्यासाठी स्वराज्य विघातक कृत्य करतो. हा इतिहास आमच्या विस्मरणात जाता कामा नये. आदर्श समाज केवळ प्रार्थना करून किंवा नामस्मरणातून निर्माण होत नाही, त्याला पराक्रमाची जोड असणे अत्यंत आवश्यक असते. महाराजांनी अत्यल्प काळात मानवी गुणवत्तेतील-बुद्धिमत्ता, श्रम, कौशल्य यांचा विकास करून उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य उपयोग केला. बलाढ्य साम्राज्यशाहीच्या दृष्टीने ज्या वस्तू टाकाऊ आहेत, त्या वस्तू त्यांच्या दृष्टीने युद्धसामग्री होती. त्यामुळेच त्यांच्या नियोजनाचासूक्ष्म अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांनी त्यांना 'व्यवस्थापन गुरू' असे संबोधले आहे. त्यांच्या अंगी असलेली गुणवत्ता आपल्याला चकित करते. मनुष्याची उत्तम परीक्षा असणारे शिवराय, मनुष्याचे सद्गुण, दुर्गुण, दुर्बलता, बलस्थाने, निष्ठा, कौशल्य, गुणवत्ता याची निश्चित पारख करून त्या व्यक्तीचा स्वराज्यासाठी काय उपयोग करून घेता येईल? याचा अचूक निष्कर्ष काढून त्याची निष्ठा तपासून त्या व्यक्तीत समर्पणभाव निर्माण करणे. त्यादृष्टीने त्याला प्रवृत्त करण्यासाठी या शिवप्रभूंकडे असणारे अचूक शब्दभांडार. जबाबदारी पेलण्याची व्यक्तीतील क्षमता, इच्छाशक्ती ओळखण्याची दिव्यदृष्टी, आपल्याला हवा असलेला माणूस शत्रूपक्षात असला, तरी त्याला आपले करण्याचे कसब, शारीरिक सामर्थ्यावर न्याय नीतीचा अंकुश नसेल, तर माणसातील राक्षसी प्रवृत्ती प्रबळ होतील. तो उन्नत होण्याऐवजी उन्मत्त होईल. सदाचार, सत्कर्म विसरेल. तसे झाले तर स्वराज्य व यवनसाम्राज्यात भेद तो कोणता? शिवछत्रपतींना स्वराज्यातून मानवतेचा विकास करावयाचा होता. बुद्धिमान, पराक्रमी, सामान्य व कसबी मनुष्यबळ स्वराज्यासाठी कसे उपयोगात आणावे? त्यावर अंकुश ठेवून त्यांच्या निष्ठा अबाधित ठेवण्याचे मार्ग शिवचरित्र दाखविते. मोजक्या सामुग्रीने बलाढ्य मुघल साम्राज्यशाहीशी संघर्षाचा विचार करणे म्हणजे त्या कालावधीत सर्वात अगोदर आपल्याच माणसांसमोर आपले हसे करून घेणे, हा अनुभव त्यांना सुरुवातीला स्वकीयांकडूनच येऊ लागला. प्रचंड इच्छाशक्ती व पराक्रम गाजविण्यासाठी अनेक पर्याय निर्माण करणे, दूरदृष्टिकोन, अत्यंत प्रतिकूल परिस्थिती सम्यक विचार करून निर्णय घेणे, शिवचरित्रातील हे विलोभनीय दर्शन आहे. अतिशय कार्यमग्न आणि जोखमीचे जीवन जगत असताना आपली संस्कृती भाषा परंपरा जोपासत ज्येष्ठ, ज्ञानी, तपस्वी यांच्याविषयी आदर, सर्वसामान्यांबद्दल जिव्हाळा, आपले इप्सित निश्चित करून ते गाठण्यासाठी अत्यंत काटेकोर नियोजन, त्यासाठी अचूक मार्ग निवडून, योग्य साधनांचा वापर करून कार्यसिद्धी गाठण्यासाठी योग्य माणसाची निवड, पशुप्रेम, साधुसंताबद्दल वंदनीय भाव, पण ढोंगबाजीला थारा नाही. किल्ले बांधणीतील विशेष कौशल्य, जरूर तिथे आक्रमकता, पण पराभवाची शक्यता दिसत असेल तर तात्कालिक माघार व परत संधी मिळताच पुन्हा चढाई, संवाद कौशल्य, स्वरातील हुकूमत. शत्रू आणि मित्र यामधील विवेक, शत्रूप्रदेशातील अचूक भौगोलिक आकलन. घोडदळ, पायदळ व नौसेना याचे ज्ञान, राजकीय असाधारण खेळी खेळताना शत्रूला त्याचा थांगपत्ताही लागू नये, असा बेमालूम धूर्तपणा. स्वराज्यातील शत्रूवर व शत्रूराज्यावर नियंत्रण ठेवून शांतचित्ताने केलेला प्रचंड खटाटोप, अपयश पचवताना दाखविलेला संयम, अचूक निर्णय घेण्याचे प्रसंगावधान, शत्रूच्या दरबारात चढ्या आवाजात प्रकट केलेला मराठी स्वाभिमान, निर्भयता, तेजस्विता, शत्रूची पुरती दिशाभूल करण्यासाठी पवित्र उद्देशाने प्रसंगपरत्वे केलेले असत्याचरण. सत्य आणि असत्याचा मर्यादा व सामर्थ्याचे उत्तम आकलन. संकटातही अविचलता. रक्तात हरामी असणारे स्वकीय असले, तरी त्यांना संपविणे त्यांना आवश्यक वाटले. स्वराज्यलढा देताना सशस्त्र क्रांतिकारकांनी 'शिवचरित्र' हा गुरुग्रंथ मनाला. त्यामुळेच सशस्त्र लढा देणारे क्रांतिकारक संख्येने कमी असले, तरी बलाढ्य ब्रिटिश साम्राज्यशाहीला पुरते हैराण करण्यात ते यशस्वी ठरले. 'आपल्या मातृभूमीचे शोषण करणाऱ्या नराधमांसाठी शांतीची भाषा कामाची नसते. हे विषारी साप दिसताक्षणी ठेचायचे असतात,' हा गुरुमंत्र क्रांतिकारकांना शिवचरित्रातून मिळाला. शत्रूच्या सुमधुर मधाळ भाषेवर कधीच विश्वास ठेवायचा नसतो. पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांना साथ देऊनही त्या बदल्यात आम्हाला जालियनवाला बाग हत्याकांड आणि देशवासीयांच्या पदरी अमानुष अत्याचारच मिळत असतील, तर आम्ही आमची नीती बदलली पाहिजे, आजही शिवाजी महाराजाचा काळ चांगला म्हणतात. कोणतीही मोफत योजना नसताना शिवाजी महाराजांचा काळाचा गौरव आजही होतो तसाच प्रमारे आपले राज्य चालले पाहिजे. हीच शिवजयंती निमित्त अपेक्षा!

# छत्रपती शिवाजी महाराज : भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक



भारतीय इतिहासाच्या अभ्यासात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्थान केवळ एका पराक्रमी योद्ध्यापुरते मर्यादित ठेवणे ही एक मोठी बौद्धिक मर्यादा ठरेल. आधुनिक इतिहासलेखन, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्या दृष्टीने पाहिले असता शिवाजी महाराज हे एक राज्यसंस्थापक, लोककल्याणकारी प्रशासक, धर्मनिरपेक्ष दृष्टी असलेले नेतृत्व आणि भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक म्हणून समोर येतात. म्हणूनच १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ स्मृतिदिन नसून भारतीय राज्यसंस्थेच्या ऐतिहासिक मुळांचा पुनर्विचार करण्याची संधी आहे.

सतराव्या शतकातील भारताची राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर होती. मुघल साम्राज्याचे केंद्रीकरण, दख्खनमधील आदिलशाहीकुतुबशाही यांचे संघर्ष, सरंजामी शोषण आणि धार्मिक-सामाजिक असुरक्षितता यांमुळे सामान्य जनता भयग्रस्त होती. अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ सत्तांतर नव्हता, तर राज्याच्या स्वरूपातच मूलभूत परिवर्तन घडवणारा होता. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही परकीय सत्तेविरोधातील प्रतिक्रिया नव्हे, तर स्वतःच्या लोकांसाठी स्वतःचे राज्य उभारण्याची सकारात्मक राजकीय दृष्टी होती.

इतिहासकार जदुनाथ सरकार, गोविंद सखाराम सरदेसाई, जेम्स लेन, स्टीवर्ट गॉर्डन यांसारख्या अभ्यासकांनी आपल्या लेखनात शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे विविध पैलू अधोरेखित केले आहेत. आधुनिक संशोधनानुसार, शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे लोकसंमतीवर आधारित, नैतिक अधिष्ठान असलेले आणि प्रशासकीय शिस्तीवर उभे असलेले राज्य होते. ''हे राज्य रयतेचे आहे'' हा विचार केवळ घोषणात्मक नव्हता, तर महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि संरक्षण धोरणांतून प्रत्यक्षात उतरवला गेला होता.

शिवाजी महाराजांच्या घडणीत जिजाऊ मातेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. जिजाऊंच्या धार्मिक-नैतिक संस्कारांतून महाराजांमध्ये धर्मभावना निर्माण झाली, पण ती संकुचित नव्हती. रामायण-महाभारत, संत परंपरा आणि लोककथा यांमधून त्यांनी कर्तव्य, न्याय आणि लोकहित यांचे मूल्य आत्मसात केले. शहाजी राजांच्या अनुभवातून त्यांनी तत्कालीन राजकारणाची गुंतागुंत समजून घेतली. त्यामुळे शिवाजी महाराजांचे नेतृत्व भावनिक नसून विवेकाधिष्ठित होते.

स्वराज्याची उभारणी करताना शिवाजी महाराजांनी स्थानिक शक्तींना संघटित केले. मावळ प्रदेशातील शेतकरी, स्थानिक सरदार, कारागीर आणि सामान्य सैनिक हे स्वराज्याचे आधारस्तंभ होते. ही प्रक्रिया आधुनिक राज्यशास्त्रात सांगितल्या जाणाऱ्या सहभागी शासन संकल्पनेशी सुसंगत आहे. त्यामुळेच स्वराज्याला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला. लोकांनी ते आपले राज्य मानले, हीच त्याच्या यशाची गुरुकिल्ली ठरली.

लष्करी दृष्टिकोनातून पाहिले असता, शिवाजी महाराजांनी स्वीकारलेली गनिमी काव्याची रणनीती ही केवळ युद्धतंत्र नव्हती, तर ती संसाधन-मर्यादेतून निर्माण झालेली बुद्धिमान रणनिती होती. भूगोलाचा अचूक वापर, वेग, गोपनीयता आणि स्थानिक पाठिंबा यांच्या जोरावर त्यांनी बलाढ्य सैन्यांना पराभूत केले. मात्र महत्त्वाचे म्हणजे, युद्धातील नैतिकता त्यांनी कधीही सोडली नाही. स्त्रिया, मुले, वृद्ध आणि धर्मस्थळे यांना अभय देण्याची त्यांची भूमिका आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवीय कायद्यांच्या तत्त्वांशी सुसंगत वाटते.

शिवाजी महाराजांचे प्रशासन हा त्यांच्या अभ्यासाचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून त्यांनी कारभाराचे विकेंद्रीकरण केले. पंतप्रधान, अमात्य, सुमंत, सचिव, सेनापती, न्यायाधीश, पंडितराव यांसारखी पदे निर्माण करून त्यांनी कार्यविभागणी व उत्तरदायित्व निश्चित केले. महसूल व्यवस्था शेतकरीकेंद्रित होती. जमिनीचे मोजमाप, पीकपद्धतीनुसार कर आकारणी आणि आपत्तीच्या काळात सवलती देणे ही धोरणे लोककल्याणकारी राज्याची लक्षणे मानली जातात.

धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे स्थान विशेष आहे. त्यांच्या काळात धर्माधारित संघर्ष सामान्य होते, तरीही त्यांनी धार्मिक सहिष्णुतेची भूमिका घेतली. मशिदींचे संरक्षण, कुराणाचा सन्मान आणि मुस्लिम अधिकाऱ्यांना महत्त्वाची पदे देणे यावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे धर्माधिष्ठित नसून नैतिक अधिष्ठान असलेले राज्य होते, असे आधुनिक इतिहासलेखन मानते.

स्त्रीसन्मानाच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन त्यांच्या काळाच्या खूप पुढचा होता. इतिहासकारांच्या नोंदींनुसार, स्त्रीवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत असे. युद्धात जिंकलेल्या स्त्रियांना सन्मानाने परत पाठवले जाई. ही भूमिका तत्कालीन सामंती मानसिकतेच्या पूर्ण विरोधात होती. त्यामुळे शिवाजी महाराजांना स्त्रीसन्मानाचे आद्य पुरस्कर्ते मानले जाते.

राज्याभिषेक हा शिवाजी महाराजांच्या जीवनातील एक निर्णायक टप्पा होता. तो केवळ धार्मिक विधी नव्हता, तर सार्वभौम भारतीय राज्याची औपचारिक घोषणा होती. परकीय सत्तांच्या छायेतून बाहेर पडून स्वराज्याला वैधता देणारा हा क्षण होता. राज्याभिषेकानंतर स्वराज्याची प्रशासकीय रचना अधिक सुसंगत आणि संस्थात्मक झाली.

शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे आकलन केवळ युद्ध आणि प्रशासनापुरते मर्यादित ठेवणे अपुरे ठरेल. त्यांच्या राज्यकारभाराचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे कूटनीती. सतराव्या शतकातील भारतीय राजकारण हे सतत बदलणाऱ्या सत्ता-समीकरणांनी व्यापलेले होते. मुघल, आदिलशाही, कुतुबशाही, स्थानिक सरदार आणि परकीय व्यापारी शक्ती यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे होते. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांनी संघर्ष, तह, संधी आणि प्रतिकार यांचा समतोल साधत स्वराज्याचे हित जपले. आधुनिक आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांतात ज्याला 'रियलपोलिटिक' म्हटले जाते, त्याचे आद्य स्वरूप त्यांच्या धोरणांत आढळते.

महाराजांनी शत्रूशीही गरज पडल्यास तह केले, परंतु स्वराज्याच्या स्वायत्ततेवर कधीही तडजोड केली नाही. आग्रा भेटीसारख्या प्रसंगात त्यांची राजकीय सूक्ष्मदृष्टी आणि मानसिक धैर्य स्पष्टपणे दिसून येते. इतिहासकारांच्या मते, आग्र्यातील कैदेतून सुटका ही केवळ धाडसी पलायन नव्हते, तर मुघल सत्तेच्या नैतिक व राजकीय मर्यादांचे भान देणारा प्रसंग होता. या घटनेनंतर शिवाजी महाराजांची प्रतिमा केवळ प्रादेशिक राजापेक्षा व्यापक बनली.

मराठा साम्राज्याचा विस्तार हा शिवाजी महाराजांच्या वैचारिक वारशाचा परिणाम होता. त्यांनी निर्माण केलेली प्रशासनिक चौकट, लष्करी शिस्त आणि लोकाभिमुख धोरणे यांमुळे पुढील पिढ्यांना साम्राज्य विस्ताराची दिशा मिळाली. छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि पुढे पेशवाई काळातील नेतृत्वाने शिवाजी महाराजांच्या संकल्पनांना पुढे नेले. तथापि, इतिहासकार हेही अधोरेखित करतात की शिवाजी महाराजांचे वैयक्तिक नेतृत्व आणि नैतिक अधिष्ठान हे अद्वितीय होते, ज्याची पुनरावृत्ती पुढील काळात तशीच्या तशी झाली नाही.

ब्रिटिश कालखंडात शिवाजी महाराजांची प्रतिमा नव्याने घडवली गेली. औपनिवेशिक इतिहासलेखनात सुरुवातीला त्यांना ''बंडखोर सरदार'' म्हणून दाखवण्याचा प्रयत्न झाला. मात्र भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी या दृष्टिकोनाला आव्हान दिले. लोकमान्य टिळकांनी शिवाजी जयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिक करून शिवाजी महाराजांना राष्ट्रीय प्रेरणास्थान बनवले. विनायक दामोदर सावरकर, महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय यांसारख्या विचारवंतांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंकल्पनेला आधुनिक स्वातंत्र्य चळवळीशी जोडले.

आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या अभ्यासात शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक स्वातंत्र्याशी जोडलेली होती. ब्रिटिश सत्तेविरोधातील लढ्यात ''स्वराज्य'' हा शब्द पुन्हा केंद्रस्थानी आला, याचे मूळ शिवाजी महाराजांच्या विचारांत आढळते. त्यामुळेच त्यांना भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक मानले जाते.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

शिवाजी महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन आधुनिक भारतासाठी विशेष संदर्भात्मक ठरतो. आजच्या बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक समाजात धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवली. त्यांच्या काळातील राजकीय वास्तव पाहता ही भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. म्हणूनच आधुनिक राज्यशास्त्रात त्यांना 'सर्वसमावेशक शासक' म्हणून पाहिले जाते.

स्त्रीसन्मानाच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे विचार आजच्या लिंगसमतेच्या चर्चेतही मार्गदर्शक ठरतात. स्त्रीला केवळ संरक्षण नव्हे, तर सन्मान देण्याची त्यांची भूमिका सामाजिक परिवर्तनाची बीजे पेरणारी होती. आधुनिक स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, शिवाजी महाराजांची भूमिका ही तत्कालीन पितृसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीत राहूनही प्रगत होती.

प्रशासनशास्त्राच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचे राज्य हे कल्याणकारी राज्याच्या प्राथमिक संकल्पनेशी सुसंगत वाटते. महसूल सवलती, आपत्ती व्यवस्थापन, न्याय्य करप्रणाली आणि लोकाभिमुख न्यायव्यवस्था ही वैशिष्ट्ये आधुनिक कल्याणकारी राज्याच्या मूलतत्त्वांशी जुळणारी आहेत. त्यामुळे शिवाजी महाराजांचे राज्य हे केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सैद्धांतिक अभ्यासासाठीही महत्त्वाचे ठरते.

आजच्या भारतात शिवाजी महाराजांचे स्मरण अनेकदा भावनिक किंवा राजकीय पातळीवर मर्यादित राहते. मात्र शैक्षणिक दृष्टीने पाहिले असता त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. अभ्यासक्रम, संशोधन आणि सार्वजनिक चर्चांमध्ये शिवाजी महाराजांना केवळ योद्धा म्हणून नव्हे, तर राज्यसंस्थापक, प्रशासक आणि सामाजिक सुधारक म्हणून मांडणे आवश्यक आहे. यामुळे इतिहासाचे अधिक समतोल आणि वैज्ञानिक आकलन विकसित होईल.

जागतिक इतिहासाच्या संदर्भात पाहिले असता, शिवाजी महाराजांची तुलना युरोपमधील राष्ट्रनिर्मात्यांशी करता येते. त्यांनी उभारलेले स्वराज्य हे स्थानिक परिस्थितीतून उगम पावलेले असले तरी त्यातील मूल्ये सार्वकालिक आहेत. स्वातंत्र्य, न्याय, लोककल्याण आणि नैतिक नेतृत्व ही मूल्ये कोणत्याही काळात आणि कोणत्याही समाजात उपयुक्त ठरतात.

समारोप करताना असे म्हणता येईल की छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ मराठा इतिहासाचे नव्हे, तर संपूर्ण भारतीय इतिहासाचे केंद्रीय व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही आधुनिक भारतीय राज्यव्यवस्थेची वैचारिक पूर्वपीठिका ठरते. १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ गौरवाचा उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. त्यांच्या विचारांकडे केवळ अभिमानाने नव्हे, तर अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहिले तरच आपण त्यांच्या वारशाशी प्रामाणिक राहू शकतो. शिवाजी महाराजांचा वारसा म्हणजे तलवारीचा नव्हे, तर विचारांचा; सत्तेचा नव्हे, तर सेवेचा; विजयाचा नव्हे, तर मूल्यांचा वारसा आहे. आधुनिक भारताच्या लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनांत त्यांच्या स्वराज्याचा प्रतिध्वनी ऐकू येतो. म्हणूनच शिवाजी महाराज इतिहासात बंदिस्त न राहता आजही वर्तमानाशी संवाद साधतात आणि भविष्याला दिशा देतात.

## राज्य शासनाने ओबीसी सुवर्ण कारागीरावरील अन्याय दूर करावा

महाराष्ट्र हे संतांचे आणि अठरा पगड जाती जमातीच्या कौशल्याचे माहेरघर आहे. राज्याच्या या सांस्कृतिक व औद्योगिक जडणघडणीत बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार यांचा वाटा अमूल्य आहे. सोनार हा या बलुतेदार पद्धतीचा एक अविभाज्य आणि अत्यंत कुशल घटक ! मात्र सध्याच्या या आधुनिक काळात या पारंपारिक सोनार सुवर्णकारांच्या अस्तित्वाचा प्रश्न गंभीर झाला आहे. अशातच महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या ''विश्वकर्मा पुरस्काराच्या ''नियमावलीतील तांत्रिक त्रुटीमुळे या समाजातील निष्णात कारागीरांना सन्मानापासून वंचित राहावे लागत आहे. हा केवळ एका समाजाचा प्रश्न नसून राज्याच्या पारंपारिक हस्तकला जतन करण्याच्या धोरणासमोरील एक मोठा पेच आहे. पंतप्रधान मा. नरेन्द्र जीं मोदी यांनी १८ सप्टेंबर २०२३ रोजी पी. एम. विश्वकर्मा योजनेची घोषणा केली. या योजनेचा मूळ गाभाच हा आहे की जे कारागीर हाताने किंवा साध्या अवाजारानी काम करतात त्यांचा विश्वकर्मा म्हणून गौरव व विकास व्हावा. यात सोनार ( गोल्ड स्मिथ )या व्यवसायाला केंद्राने अग्रक्रमाने स्थान दिले आहे. केंद्राने ज्या कारागीरांना विश्वकर्मा म्हणून राष्ट्रीय स्तरावर मान्यता दिली त्यांनाच महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभाग आपल्या पुरस्कारासाठी अपात्र ठरवत आहे . ही मोठी धोरणात्मक विसंगती आहे. सोनार, सुवर्णकार केवळ ओबीसी प्रवर्गात मोडतात म्हणून या कारागीरांना विश्वकर्मा पुरस्कारातून वगळणे हे कौशल्या पेक्षा प्रवर्गाला अधिक महत्व देणारे ठरत आहे . आज सुवर्णकारांचे अस्तित्व धोक्यात आहे. आजच्या कॉम्प्युटर एडेड डिझाईन ( सिएडी )आणि यंत्रा द्वारे बनविलेल्या दागिन्याच्या काळात हाताने नक्षीकाम करणारे कारागीर आर्थिक दृष्ट्या पिचले गेले आहेत. मोडी लिपितील कोरीव काम, अस्सल मराठ मोळे ठसा काम आणि दुर्मिळ तार काम या कला केवळ सुवर्णकारांच्या बोटामध्ये जिवंत आहेत. या कारागीरांना सरकारी सन्मान आणि प्रोत्साहन मिळाले नाही तर ही पारंपारिक कला पुढील पिढी पर्यंत पोहोचणार नाही. शासनाचा विश्वकर्मा पुरस्कार हा अशाच अस्तगत, नष्ट होत चाललेल्या कलांचे पुनःरूज्जीवन करण्यासाठी असावा, न केवळ कागदोपत्री प्रवर्गाची पूर्तता करण्यासाठी. बदलत्या काळाची गरज ओळखून व्यावसायिक निकष शासनाने विचारात घेणे आवश्यक आहे की, विश्वकर्मा हे नावच मुळी कारागीरांचे आध्य दैवत आहे. पाचही पांचाल लोहार, सुतार, तांबट, शिलावट -शिल्पी, आणि सोनार हे एकाच परंपरेचे पाईक आहेत. आशा वेळी केवळ कांही पोट जातींना पुरस्कार देणे आणि सुवर्ण कारागीरांना डावलणे हे सामाजिक न्यायाच्या तत्वाला छेद देणारे आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाने आपल्या पुढील वर्षाच्या शासन निर्णयात सुधारणा करून लाभार्थी गटाची व्याख्या प्रवर्गा ऐवजी व्यवसायाधारित करणे काळाची गरज आहे. या संदर्भात सोनार समाज संस्था सोलापूर च्या वतीने सविस्तर निवेदन तयार करून राज्याचे मुख्यमंत्री, इतर मागास बहुजन कल्याण विकास मंत्री, सोलापूर जिल्हा पालक मंत्री आणि विधान परिषद आमदार सौं. चित्राताई वाघ मॅडम आणि प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग व सहाय्यक संचालक, जिल्हा कार्यालय यांना सादर करून मागणी केली आहे. प्रशासकीय स्तरावर अपेक्षित पाऊल उचलून मा .जिल्हा माहिती अधिकारी आणि मा.जिल्हा प्रशासन यांनी या विषयांचे गांभीर्य ओळखून वृत्त पत्रातील या लोक भावनेची दखल घेऊन ती मंत्रालयीन स्तरावर पोहोचविणे आवश्यक आहे. राज्याच्या प्रधान सचिव साहेबांनी केंद्राच्या पी. एम. विश्वकर्मा योजना विचारात घेऊन राज्याच्या पुरस्कार नियमावलीत ओबीसी प्रवर्गातील सोनार सुवर्ण कारागीरांचा समावेश करावा. यामुळे ग्रामीण व शहरी भागातील हजारो अल्पशिक्षित पण कलासक्त कारागीरांना एक नवी उमेद मिळेल . शेवटी पुरस्कार हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसतो, तो त्या कलेचा आणि पारंपारिक परंपरेचा गौरव असतो. सुवर्ण कारागीरांच्या हातातील ही जादू जिवंत ठेवणे हे शासनाचे आणि समाजाचे नैतिक कर्तव्य आहे.

**वसंत पोतदार, अध्यक्ष**
**सोनार समाज संस्था, सोलापूर**
**मोबा. ९४२३० ६५९१५**

------------------

## हाडांसाठी गुणकारी आहे काकडीचे पाणी, जाणून घ्या आश्चर्यकारक फायदे

हाडांच्या आरोग्यासाठी निरोगी आहार घेणे आवश्यक आहे. तुमच्या आहारात निरोगी पदार्थांचा समावेश करून हाडांचे आरोग्य मजबूत करता येते. विशेषतः जर तुमची हाडे कमकुवत असतील किंवा हाडांशी संबंधित आजार असेल, तर तुमच्या हाडांच्या आरोग्याची काळजी घेणे अधिक महत्त्वाचे बनते.

हाडे मजबूत करण्यासाठी तुम्ही अनेक गोष्टी खाऊ शकता. परंतु अनेकांना माहिती नसेल की, काकडीचे पाणी हाडांच्या आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. काकडीच्या पाण्यात मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि फॉस्फरस सारखे पोषक घटक असतात, जे हाडांना निरोगी ठेवण्यास हातभार लावतात. काकडीचे पाणी पिल्याने हाडांची ताकद वाढते आणि ऑस्टियोपोरोसिससारख्या आजारांना प्रतिबंधित करते. पाहूया हाडांसाठी काकडीचे पाणी पिण्याचे फायदे.

**हाडांची लवचिकता वाढते**

काकडीचे पाणी पिल्याने हाडांची लवचिकता टिकून राहते आणि सांध्याची हालचाल सुधारते. काकडीचे पाणी शरीराला हायड्रेट करते आणि हाडांच्या पेशींमध्ये ओलावा टिकवून ठेवते.

**सांधेदुखीपासून आराम-**

तज्ज्ञांच्या मते, काकडीतील व्हिटॅमिन के हाडांच्या बळकटीसाठी आवश्यक आहे. नियमित सेवनाने हाडांचे आरोग्य सुधारते. काकडीच्या पाण्यात अँटी इन्फ्लीमेंट्री गुणधर्म असतात जे सांध्याची सूज आणि वेदना कमी करतात. व्यायामानंतर काकडीचे पाणी पिणे स्नायूंच्या निर्मितीसाठी आणि जळजळ कमी करण्यासाठी फायदेशीर आहे.


**हाडे मजबूत बनतात-**

काकडीतील व्हिटॅमिन २ हाडांच्या बळकटीसाठी आवश्यक आहे. ते सेवन केल्याने हाडे मजबूत होतात.काकडीचे पाणी हाडांसाठी फायदेशीर आहे. कमकुवत हाडांमुळे वारंवार फ्रॅक्चर होणाऱ्या लोकांनी काकडीचे पाणी सेवन करावे. काकडीचे पाणी पिल्याने हाडांचा कमकुवतपणा कमी होण्यास मदत होते. काकडीच्या पाण्यात असलेले कॅल्शियम आणि मॅग्नेशियम हाडांसाठी फायदेशीर आहे.

**हाडांची वाढ आणि ताकद**

काकडीचे पाणी पिल्याने हाडांच्या विकासास मदत होते. काकडीचे पाणी पिणे मुलांसाठी आणि किशोरवयीन मुलांसाठी फायदेशीर आहे. त्यात असलेले पोषक तत्व हाडांची वाढ आणि ताकद वाढविण्यास मदत करतात. यामुळे मुलांमध्ये कॅल्शियमच्या कमतरतेमुळे होणाऱ्या समस्या टाळता येतात.

# छत्रपती शिवाजी महाराज : भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक



**भारतीय इतिहासाच्या अभ्यासात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्थान केवळ एका पराक्रमी योद्ध्यापुरते मर्यादित ठेवणे ही एक मोठी बौद्धिक मर्यादा ठरेल. आधुनिक इतिहासलेखन, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्या दृष्टीने पाहिले असता शिवाजी महाराज हे एक राज्यसंस्थापक, लोककल्याणकारी प्रशासक, धर्मनिरपेक्ष दृष्टी असलेले नेतृत्व आणि भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक म्हणून समोर येतात. म्हणूनच १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ स्मृतिदिन नसून भारतीय राज्यसंस्थेच्या ऐतिहासिक मुळांचा पुनर्विचार करण्याची संधी आहे. सतराव्या शतकातील भारताची राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर होती. मुघल साम्राज्याचे केंद्रीकरण, दख्खनमधील आदिलशाही–कुतुबशाही यांचे संघर्ष, सरंजामी शोषण आणि धार्मिक–सामाजिक असुरक्षितता यांमुळे सामान्य जनता भयग्रस्त होती. अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ सत्तांतर नव्हता, तर राज्याच्या स्वरूपातच मूलभूत परिवर्तन घडवणारा होता. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही परकीय सत्तेविरोधातील प्रतिक्रिया नव्हे, तर स्वतःच्या लोकांसाठी स्वतःचे राज्य उभारण्याची सकारात्मक राजकीय दृष्टी होती.**



इतिहासकार जदुनाथ सरकार, गोविंद सखाराम सरदेसाई, जेम्स लेन, स्टीवर्ट गॉर्डन यांसारख्या अभ्यासकांनी आपल्या लेखनात शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे विविध पैलू अधोरेखित केले आहेत. आधुनिक संशोधनानुसार, शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे लोकसंमतीवर आधारित, नैतिक अधिष्ठान असलेले आणि प्रशासकीय शिस्तीवर उभे असलेले राज्य होते. हे राज्य रयतेचे आहे हा विचार केवळ घोषणात्मक नव्हता, तर महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि संरक्षण धोरणांतून प्रत्यक्षात उतरवला गेला होता.

शिवाजी महाराजांच्या घडणीत जिजाऊ मातेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. जिजाऊंच्या धार्मिक–नैतिक संस्कारांतून महाराजांमध्ये धर्मभावना निर्माण झाली, पण ती संकुचित नव्हती. रामायण–महाभारत, संत परंपरा आणि लोककथा यांमधून त्यांनी कर्तव्य, न्याय आणि लोकहित यांचे मूल्य आत्मसात केले. शहाजी राजांच्या अनुभवातून त्यांनी तत्कालीन राजकारणाची गुंतागुंत समजून घेतली. त्यामुळे शिवाजी महाराजांचे नेतृत्व भावनिक नसून विवेकाधिष्ठित होते.स्वराज्याची उभारणी करताना शिवाजी महाराजांनी स्थानिक शक्तींना संघटित केले. मावळ प्रदेशातील शेतकरी, स्थानिक सरदार, कारागीर आणि सामान्य सैनिक हे स्वराज्याचे आधारस्तंभ होते. ही प्रक्रिया आधुनिक राज्यशास्त्रात सांगितल्या जाणाऱ्या सहभागी शासन संकल्पनेशी सुसंगत आहे. त्यामुळेच स्वराज्याला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला. लोकांनी ते आपले राज्य मानले, हीच त्याच्या यशाची गुरुकिल्ली ठरली.

लष्करी दृष्टिकोनातून पाहिले असता, शिवाजी महाराजांनी स्वीकारलेली गनिमी काव्याची रणनीती ही केवळ युद्धतंत्र नव्हती, तर ती संसाधन–मर्यादेतून निर्माण झालेली बुद्धिमान रणनिती होती. भूगोलाचा अचूक वापर, वेग, गोपनीयता आणि स्थानिक पाठिंबा यांच्या जोरावर त्यांनी बलाढ्य सैन्यांना पराभूत केले. मात्र महत्त्वाचे म्हणजे, युद्धातील नैतिकता त्यांनी कधीही सोडली नाही. स्त्रिया, मुले, वृद्ध आणि धर्मस्थळे यांना अभय देण्याची त्यांची भूमिका आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवीय कायद्यांच्या तत्त्वांशी सुसंगत वाटते.

शिवाजी महाराजांचे प्रशासन हा त्यांच्या अभ्यासाचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून त्यांनी कारभाराचे विकेंद्रीकरण केले. पंतप्रधान, अमात्य, सुमंत, सचिव, सेनापती, न्यायाधीश, पंडितराव यांसारखी पदे निर्माण करून त्यांनी कार्यविभागणी व उत्तरदायित्व निश्चित केले. महसूल व्यवस्था शेतकरीकेंद्रित होती. जमिनीचे मोजमाप, पीकपद्धतीनुसार कर आकारणी आणि आपत्तीच्या काळात सवलती देणे ही धोरणे लोककल्याणकारी राज्याची लक्षणे मानली जातात.

धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे स्थान विशेष आहे. त्यांच्या काळात धर्माधारित संघर्ष सामान्य होते, तरीही त्यांनी धार्मिक सहिष्णुतेची भूमिका घेतली. मशिदींचे संरक्षण, कुराणाचा सन्मान आणि मुस्लिम अधिकाऱ्यांना महत्त्वाची पदे देणे यावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे धर्माधिष्ठित नसून नैतिक अधिष्ठान असलेले राज्य होते, असे आधुनिक इतिहासलेखन मानते.

स्त्रीसन्मानाच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन त्यांच्या काळाच्या खूप पुढचा होता. इतिहासकारांच्या नोंदींनुसार, स्त्रीवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत असे. युद्धात जिंकलेल्या स्त्रियांना सन्मानाने परत पाठवले जाई. ही भूमिका तत्कालीन सामंती मानसिकतेच्या पूर्ण विरोधात होती. त्यामुळे शिवाजी महाराजांना स्त्रीसन्मानाचे आद्य पुरस्कर्ते मानले जाते.

राज्याभिषेक हा शिवाजी महाराजांच्या जीवनातील एक निर्णायक टप्पा होता. तो केवळ धार्मिक विधी नव्हता, तर सार्वभौम भारतीय राज्याची औपचारिक घोषणा होती. परकीय सत्तांच्या छायेतून बाहेर पडून स्वराज्याला वैधता देणारा हा क्षण होता. राज्याभिषेकानंतर स्वराज्याची प्रशासकीय रचना अधिक सुसंगत आणि संस्थात्मक झाली.

शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे आकलन केवळ युद्ध आणि प्रशासनापुरते मर्यादित ठेवणे अपुरे ठरेल. त्यांच्या राज्यकारभाराचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे कूटनीती. सतराव्या शतकातील भारतीय राजकारण हे सतत बदलणाऱ्या सत्ता–समीकरणांनी व्यापलेले होते. मुघल, आदिलशाही, कुतुबशाही, स्थानिक सरदार आणि परकीय व्यापारी शक्ती यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे होते. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांनी संघर्ष, तह, संधी आणि प्रतिकार यांचा समतोल साधत स्वराज्याचे हित जपले. आधुनिक आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांतात ज्याला 'रियलपोलिटिक' म्हटले जाते, त्याचे आद्य स्वरूप त्यांच्या धोरणांत आढळते.

महाराजांनी शत्रूशीही गरज पडल्यास तह केले, परंतु स्वराज्याच्या स्वायत्ततेवर कधीही तडजोड केली नाही. आग्रा भेटीसारख्या प्रसंगात त्यांची राजकीय सूक्ष्मदृष्टी आणि मानसिक धैर्य स्पष्टपणे दिसून येते. इतिहासकारांच्या मते, आग्र्यातील कैदेतून सुटका ही केवळ धाडसी पलायन नव्हते, तर मुघल सत्तेच्या नैतिक व राजकीय मर्यादांचे भान देणारा प्रसंग होता. या घटनेनंतर शिवाजी महाराजांची प्रतिमा केवळ प्रादेशिक राजापेक्षा व्यापक बनली.

मराठा साम्राज्याचा विस्तार हा शिवाजी महाराजांच्या वैचारिक वारशाचा परिणाम होता. त्यांनी निर्माण केलेली प्रशासनिक चौकट, लष्करी शिस्त आणि लोकाभिमुख धोरणे यांमुळे पुढील पिढ्यांना साम्राज्य विस्ताराची दिशा मिळाली. छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि पुढे पेशवाई काळातील नेतृत्वाने शिवाजी महाराजांच्या संकल्पनांना पुढे नेले. तथापि, इतिहासकार हेही अधोरेखित करतात की शिवाजी महाराजांचे वैयक्तिक नेतृत्व आणि नैतिक अधिष्ठान हे अद्वितीय होते, ज्याची पुनरावृत्ती पुढील काळात तशीच्या तशी झाली नाही.

ब्रिटिश कालखंडात शिवाजी महाराजांची प्रतिमा नव्याने घडवली गेली. औपनिवेशिक इतिहासलेखनात सुरुवातीला त्यांना बंडखोर सरदार म्हणून दाखवण्याचा प्रयत्न झाला. मात्र भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी या दृष्टिकोनाला आव्हान दिले. लोकमान्य टिळकांनी शिवाजी जयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिक करून शिवाजी महाराजांना राष्ट्रीय प्रेरणास्थान बनवले. विनायक दामोदर सावरकर, महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय यांसारख्या विचारवंतांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंकल्पनेला आधुनिक स्वातंत्र्य चळवळीशी जोडले.

आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या अभ्यासात शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक स्वातंत्र्याशी जोडलेली होती. ब्रिटिश सत्तेविरोधातील लढ्यात स्वराज्य हा शब्द पुन्हा केंद्रस्थानी आला, याचे मूळ शिवाजी महाराजांच्या विचारांत आढळते. त्यामुळेच त्यांना भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक मानले जाते.

शिवाजी महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन आधुनिक भारतासाठी विशेष संदर्भात्मक ठरतो. आजच्या बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक समाजात धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवली. त्यांच्या काळातील राजकीय वास्तव पाहता ही भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. म्हणूनच आधुनिक राज्यशास्त्रात त्यांना 'सर्वसमावेशक शासक' म्हणून पाहिले जाते.स्त्रीसन्मानाच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे विचार आजच्या लिंगसमतेच्या चर्चेतही मार्गदर्शक ठरतात. स्त्रीला केवळ संरक्षण नव्हे, तर सन्मान देण्याची त्यांची भूमिका सामाजिक परिवर्तनाची बीजे पेरणारी होती. आधुनिक स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, शिवाजी महाराजांची भूमिका ही तत्कालीन पितृसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीत राहूनही प्रगत होती.

प्रशासनशास्त्राच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचे राज्य हे कल्याणकारी राज्याच्या प्राथमिक संकल्पनेशी सुसंगत वाटते. महसूल सवलती, आपत्ती व्यवस्थापन, न्याय्य करप्रणाली आणि लोकाभिमुख न्यायव्यवस्था ही वैशिष्ट्ये आधुनिक कल्याणकारी राज्याच्या मूलतत्त्वांशी जुळणारी आहेत. त्यामुळे शिवाजी महाराजांचे राज्य हे केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सैद्धांतिक अभ्यासासाठीही महत्त्वाचे ठरते.आजच्या भारतात शिवाजी महाराजांचे स्मरण अनेकदा भावनिक किंवा राजकीय पातळीवर मर्यादित राहते. मात्र शैक्षणिक दृष्टीने पाहिले असता त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. अभ्यासक्रम, संशोधन आणि सार्वजनिक चर्चांमध्ये शिवाजी महाराजांना केवळ योद्धा म्हणून नव्हे, तर राज्यसंस्थापक, प्रशासक आणि सामाजिक सुधारक म्हणून मांडणे आवश्यक आहे. यामुळे इतिहासाचे अधिक समतोल आणि वैज्ञानिक आकलन विकसित होईल.जागतिक इतिहासाच्या संदर्भात पाहिले असता, शिवाजी महाराजांची तुलना युरोपमधील राष्ट्रनिर्मात्यांशी करता येते. त्यांनी उभारलेले स्वराज्य हे स्थानिक परिस्थितीतून उगम पावलेले असले तरी त्यातील मूल्ये सार्वकालिक आहेत. स्वातंत्र्य, न्याय, लोककल्याण आणि नैतिक नेतृत्व ही मूल्ये कोणत्याही काळात आणि कोणत्याही समाजात उपयुक्त ठरतात. समारोप करताना असे म्हणता येईल की छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ मराठा इतिहासाचे नव्हे, तर संपूर्ण भारतीय इतिहासाचे केंद्रीय व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही आधुनिक भारतीय राज्यव्यवस्थेची वैचारिक पूर्वपीठिका ठरते. १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ गौरवाचा उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. त्यांच्या विचारांकडे केवळ अभिमानाने नव्हे, तर अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहिले तरच आपण त्यांच्या वारशाशी प्रामाणिक राहू शकतो. शिवाजी महाराजांचा वारसा म्हणजे तलवारीचा नव्हे, तर विचारांचा; सत्तेचा नव्हे, तर सेवेचा; विजयाचा नव्हे, तर मूल्यांचा वारसा आहे. आधुनिक भारताच्या लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनांत त्यांच्या स्वराज्याचा प्रतिध्वनी ऐकू येतो. म्हणूनच शिवाजी महाराज इतिहासात बंदिस्त न राहता आजही वर्तमानाशी संवाद साधतात आणि भविष्याला दिशा देतात. *डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



मागील काही वर्षांमध्ये सेक्शुएलिटीबद्दल लोक जास्त खुलून बोलू लागले आहे. आता या मुद्द्यांवर प्रत्येक व्यक्ती आपले विचार आणि आवड निवड व्यक्त करू लागला आहे. अलैंगिक, हा एक असा शब्द आहे ज्याबद्दल आतापर्यंत तुम्ही फारच कमी किंवा कदाचित ऐकले ही नसेल. यात ते लोक येतात ज्यांना सेक्सची इच्छा नसते किंवा जे रिलेशनशिपबगैर संबंध बनवण्यास तयार होऊन जातात आणि ते लोक मुलगी असो की मुलगा दोघांशी संबंध बनवण्यास तयार होऊन जातात. **(क्रमशः)**

## २ Joke — विनोद




साहिल : ङ्गदहा मिनिटं झाली तरी फोनवर तु फक्त हो, हो म्हणताय?फ

अजय : ङ्गअरे, बाबा, माझ्या बायकोचा फोन होता.

## ३ Message — संदेश




Santa ne challenge kiya.....
"Ki woh kutubminar ko sr pe rakh k mumbai le jayega"...
Sare new channel wale waha pahuch gye....
Tab bola "Bas koi utha k sar pe rakh de"...

## ४ Thought — सुविचार




आत्मविश्वास असावा पण अंहकार नसावा. –अज्ञान

**संस्कृत सुभाषित**

**शरदि न वर्षति गर्जति ।**
**वर्षति वर्षासु निःस्वतो मेघः।**
**नीचो वदति न कुरुते ।**
न वदति सुजनः करोत्येव।।

**अर्थ :** शरद ऋतुत मेघ नुसताच गर्जतो, वर्षा ऋतुत न गर्जणारा मेघ बरसतो, दुष्ट नुसताच बडबडतो, काही करत नाही, सज्जन बोलत नाहीत तर करूनच दाखवतात.

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. पूर्वी गाणीबातम्या ऐकण्यासाठी याचा वापर करीत
४. पराक्रमी
७. रामदासांचे प्रसिद्ध काव्य
११. खलाशी
१२. कर्णभूषण
१४. गोष्ट
१५. केविलवाणा
१६. पुसट, धूसर
१७. असत्य
१९. सुगरण पक्ष्याचे घरटे
२२. भांडण
२३. मर्यादा, अंत
२५. वाडवडिलांनी कमावलेले
२६. तल्लीन
२७. मैत्रीण
२८. पार्वती
२९. किल्ला
३०. उलट, प्रतिकूल
३४. धनको
३६. मालिका, हार
३७. हनुमान
३८. समशेर
४०. काकुनी
४२. अफवा
४३. हुलगे
४५. सहाय्य
४६. विविध प्रकारचे
४७. लहान
५०. पाण्याचा नळ
५१. वायू
५३. सभा
५४. कोरडे, वैराण
५५. लेखणी
५७. आवड
५९. पाषाण
६१. दारूचा एक प्रकार
६२. वि.वा. शिरवाडकरांचे हे नाटक विशेष लोकप्रिय आहे
६४. चिंतन
६६. लक्ष्मी
६७. विषयांध
७२. धूळ, केर
७४. श्रावणात अनेकजण याची पूजा करतात
७७. सत्यवानाची बायको
७९. गुलामी
८०. कमी दर्जाचे
८१. नेमस्त

### उभे शब्द

१. वाळू
२. शिजवलेला भात
३. भूमी
५. हसण्याजोगे, पोरकट
६. रुदन
८. स्त्री
९. धार्मिक काव्याचा एक प्रकार
१०. कथालेखक
१२अ. पाकिट
१५. दिवाळी
१८. झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक शीतपेय
२०. गोफण, बेचकी
२१. कमावलेले (धन)
२२. घट्ट
२३. आंब्याची एक जात
२४. पंढरीची पायी यात्रा
२६. रामायणातील प्रसिद्ध अरण्य
२७. बेचव
२८. एक लोकप्रिय वाङ्मायप्रकार
२९. तृण
३१. कामकुचार, सुस्त
३२. अंगठ्यापासून सर्वात दूरचे बोट
३३. गगन
३५. जाडसर दळलेला गहू
३६. पीछेहाट
३९. मार्गस्थ
४०. ही साखर गुलकंदात वापरतात
४१. नवरा
४३. कपटी
४४. पक्ष्यांचा समूह
४६. आवाज
४८. मऊ
४९. पूर्वज
५०. अपुरा
५२. कोल्ह्यासारखा पशू
५३. नमस्कार
५६. यथेच्छ
५८. सार्वभौम राजा
६०. चांगले
६३. एकाग्र दृष्टी, ६५. भ्रतार
६७. छळ, त्रास
६८. खरेपणा
६९. रानात पसरलेली आग
७०. मत्स्य
७१. कागदकापड कापण्याचे साधन
७२. केव्हा
७३. बेकरी मालासाठी आवश्यक पदार्थ
७५. रोटीचा एक प्रकार
७६. प्राण नेणारा देव
७८. तांबूल

### आडवे उत्तरे

१.रेडियो ४.बहादूर ७.मनाचे ेक ११.दर्यावर्दी १२.डूल १४.कथा १५.दीन १६.अस्पष्ट १७.खोटे १९.खोपा २२.तंटा २३.परावार २५.वडिलोपार्जित २६.दंग २७.सय २८.काली २९.गड ३०.विपरीत ३४.सावकार ३६.माळ ३७.बजरंगबली ३८.तरवार ४०.खर्डेघाशी ४२.वावडी ४३.कुळीथ ४५.मदत ४६.नाना ४७.सान ५०.तोटी ५१.वात ५३.सद ५४.रखरखीत ५५.कलम ५७.रस ५९.शिला ६१.रम ६२.नटसम्राट ६४.मनन ६६.श्री ६७.कामुक ७२.कचरा ७४.सत्यनारायण ७७.सावित्री ७९.दास्य ८०.हीन ८१.मवाळ

### उभे उत्तरे

१.रेती २.ओदन ३.अवनी ५.हास्यास्पद ६.रडू ८.नारी ९.ेक १०.कथाकार १२अ.लखोटा १५.दीपावली १८.नीरा २०.गलोल २१.अर्जित २२.तंग २३.पायरी २४.वारी २६.दंडकारण्य २७.सपक २८.कादंबरी २९.गवत ३१.आळशी ३२.करंगळी ३३.अंबर ३५.रवा ३६.माघार ३९.रवाना ४०.खडीसाखर ४१.दादला ४३.कुटील ४४.थवा ४६.नाद ४८.नरम ४९.पितर ५०.तोकडा ५२.तरस ५३.सलाम ५६.मनमुराद ५८.सम्राट ६०.छान ६३.टक ६५.नवरा ६७.काच ६८.प्रत्यही ६९.वणवा ७०.मासा ७१.कात्री ७२.कधी ७३.मैदा ५.नान ७६.यम ७८.विडा



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त



### कोणी केला होता पाकिस्तानच्या पिएम ला फोन? ज्यानंतर भारतासमोर खेळायला तयार झाला पाकिस्तान

**नवी दिल्ली**–१५ फेब्रुवारी रोजी रविवारी भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात ग्रुप स्टेजचा सामना खेळवला गेला. या सामन्यात भारताने तब्बल ६१ धावांनी पाकिस्तानचा लाजिरवाणा पराभव केला. टीम इंडियाने पाकिस्तानला ११४ धावांवर ऑलआउट केलं. त्यामुळे टीम इंडियाने सलग तीन ग्रुप स्टेज सामने जिंकून सुपर ८ मध्ये प्रवेश केला. तर पाकिस्तानला सुपर ८ मध्ये प्रवेशासाठी अजून एक सामना खेळवाव लागणार आहे. यंदाच्या वर्ल्ड कपमधील भारत – पाकिस्तान सामना हा मोठ्या ड्रामानंतर पार पडला होता. कारण पाकिस्तानने बांगलादेशला पाठिंबा दर्शवत आधी भारताविरुद्ध सामन्यावर बहिष्कार टाकण्याची धमकी दिली होती. मात्र त्यानंतर सामन्याच्या काही दिवसांपूर्वी ९ तारखेला पाकिस्तान सरकारने त्यांचा निर्णय बदलला आणि त्यांच्या राष्ट्रीय संघाला भारताविरुद्ध सामना खेळण्याची परवानगी दिली. मात्र पाकिस्तानने आपल्या बहिष्काराच्या निर्णयावरून घेतलेला यूटर्न कोणामुळे शक्य झाला. याविषयी महत्वाची माहिती समोर आली आहे. कोलंबो येथे झालेला भारत विरुद्ध पाकिस्तान सामना पाहण्यासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसिन नकवी आले होते.

### पाकिस्तानची सुपर-८ मध्ये धडक; नामिबियाचा १०२ धावांनी पराभव

**कोलंबो**–२०२६ च्या टी–२० विश्वचषकातील ३५ वा सामना पाकिस्तान आणि नामिबिया क्रिकेट संघात खेळवण्यात आला. या सामन्यात पाकिस्ताननं शानदार कामगिरी करत नामिबियाला हरवून सुपर–८ मध्ये आपलं स्थान निश्चित केलं. पाकिस्तानकडून सलामीवीर साहिबजादा फरहाननं दमदार शतक झळकावलं आणि पाकिस्ताननं हा सामना १०२ धावांनी जिंकून खळबळ उडवून दिली. पाकिस्ताननं १९९ केल्या धावा : फलंदाज म्हणून सलामीला आलेल्या साहिबजादा फरहाननं शानदार फलंदाजीचं प्रदर्शन केलं. त्यानं ५८ चेंडूत ११ चौकार आणि ४ षटकार मारत नाबाद १०० धावा केल्या. सॅम अयुबनंही १२ चेंडूत १४ धावा केल्या. कर्णधार सलमान अली आघानं २३ चेंडूत ३८ धावा केल्या. अखेर शादाब खाननं २२ चेंडूत ३६ धावा केल्या. अशाप्रकारे, पाकिस्ताननं २० षटकांत ३ गडी गमावून १९९ धावा केल्या. नामिबियाचा ९७ धावांत खुर्दा : लक्ष्याचा पाठलाग करताना नामिबियाकडून सलामीवीर लॉरेन स्टीनकॅम्पनं २३ धावा केल्या, तर त्याला साथ देण्यासाठी आलेल्या जान फ्रायलिंकनं ९ धावा केल्या.

### साहिबजादा फरहानने घडवला इतिहास! टी-२० वर्ल्डकपमध्ये 'अशी' कामगिरी करणारा ठरला पाकचा दुसरा फलंदाज

**दिल्ली**–आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील ३५ वा सामना पाकिस्तान आणि नामिबिया या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. हा दोन्ही संघांचा साखळी फेरीतील शेवटचा सामना आहे. पण हा सामना पाकिस्तानसाठी अतिशय महत्वाचा आहे. पाकिस्तानकडे हा सामना जिंकून सुपर ८ मध्ये प्रवेश करण्याची सुवर्णसंधी आहे. पण जर हा सामना गमावला, तर घरी परतावे लागेल. दरम्यान या महत्वाच्या सामन्यात पाकिस्तानकडून सलामीला येणाऱ्या साहिबजादा फरहानने दमदार शतकी खेळी केली. या शतकी खेळीच्या बळावर त्याने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या डावात फलंदाजीला आलेल्या पाकिस्तानला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. सईम अयुब अवघ्या १४ धावांवर माघारी परतला. तर सलमान अली आघाने २३ चेंडूत ३८ धावांचे योगदान दिले. अवघे ३ टी–२० आंततरराष्ट्रीय सामने खेळण्याचा अनुभव असणाऱ्या ख्वाजा नफायला या सामन्यासाठी पाकिस्तानच्या संघात स्थान देण्यात आलं होतं.

## भारतीय संघ अजिंक्य! नेदरलँड्सवर मिळवला ऐतिहासिक विजय

### शिवम दुबे-वरूण चक्रवर्ती ठरले गेमचेंजर




शिवम दुबेची धमाकेदार फलंदाजी, हार्दिक पांड्याही चमकला, नेदरलँड्सला धू-धू धुतले

**अहमदाबाद**–अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुरू असलेल्या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करत १९३ धावांचा मजबूत टप्पा गाठला. नाणेफेक जिंकून कर्णधाराने आधी बॅटिंगचा निर्णय घेतला होता. मात्र अपेक्षेपेक्षा वेगळे चित्र पाहायला मिळाले. नेदरलँड्सच्या गोलंदाजांनी आक्रमक मारा करत भारतीय फलंदाजांना सहज खेळ करू दिला नाही. विशेषत: आर्यन दत्तने प्रभावी गोलंदाजी करत सर्वांचे लक्ष वेधले.

भारताची धक्कादायक सुरुवात...

भारताची सुरुवात मात्र धक्कादायक ठरली. सलामीवीर अभिषेक शर्मा शून्यावर बाद झाला. या विश्वचषकात तिसऱ्यांदा तो खाते न उघडताच परतला. ईशान किशनने झटपट सुरुवात केली, पण केवळ ७ चेंडूत १८ धावा करून तोही माघारी परतला. तिलक वर्माने संयमी खेळ करत ३१ धावांचे योगदान दिले, तर कर्णधार सूर्यकुमार यादवने मधल्या षटकांमध्ये डाव सावरत ३४ धावा केल्या. मात्र खऱ्या अर्थाने शिवम दुबेने डावाला वेग दिला. त्याने झंझावाती अर्धशतक ठोकत भारताला १९३ धावांपर्यंत पोहोचवण्यात मोलाची भूमिका बजावली.

शिवम दुबे नावाचं वादळ...

शिवम दुबे नवव्या षटकात फलंदाजीला आला, तेव्हा त्याची सुरुवात अतिशय संथ झाली होती. पहिल्या ११ चेंडूमध्ये त्याने फक्त ६ धावा केल्या. मात्र त्यानंतर त्याने गिअर बदलला आणि पुढील १४ चेंडूमध्ये तब्बल ४४ धावा ठोकत सामना भारताच्या बाजूने फिरवला. केवळ २५ चेंडूमध्ये त्याने आपले अर्धशतक पूर्ण केले, टी–२० वर्ल्ड कपमधील त्याची ही पहिलीच अर्धशतकी खेळी ठरली. दुबेने ३१ चेंडूत ६६ धावांची झंझावाती खेळी साकारली, ज्यात ४ चौकार आणि ६ षटकारांचा समावेश होता.

हार्दिक पांड्याची साथ

हार्दिक पांड्या यानेही दुबेला साथ दिली. हार्दिकने २१ चेंडूत ३० धावा करत आक्रमक फलंदाजी केली. पहिल्या ११ षटकांत भारताने केवळ ७६ धावा केल्या होत्या. पण शेवटच्या ९ षटकांत भारतीय फलंदाजांनी तब्बल ११७ धावा काढत सामन्याचा चेहरामोहरा बदलला. दुबे आणि हार्दिक यांच्यातील ७६ धावांची भागीदारी हा या झंझावाती पुनरागमनाचा मुख्य आधार ठरला. अखेरच्या ९ चेंडूमध्ये भारताने ४ षटकार मारले, जरी त्याच वेळी २ गडी बाद झाले. नेदरलँड्सकडून लोगान व्हॅन बीक सर्वाधिक प्रभावी ठरला. त्याने ३ विकेट्स घेत भारतीय फलंदाजांना काही प्रमाणात रोखण्याचा प्रयत्न केला. आर्यन दत्त याने २ बळी घेतले, तर काइल क्लेन यानेही १ विकेट आपल्या नावावर जमा केली.



स्पेनमधील गिरोना येथे सुरू असलेल्या ला लीगा फुटबॉल सामन्यादरम्यान स्पर्धा करताना गिरोना एफसी आणि एफसी बार्सिलोनाचे खेळाडू.

## अभिषेक शर्माची हॅटट्रिक; लाजिरवाण्या विक्रमात प्रशिक्षक गंभीरला टाकलं मागे

अहमदाबाद–भारतीय क्रिकेट संघ अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर नेदरलँड्सविरुद्ध २०२६ च्या टी–२० विश्वचषकातील शेवटचा गट फेरीचा सामना खेळत आहे. टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवनं सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळं अभिषेक शर्माकडून मोठ्या खेळीची अपेक्षा सर्वांना होती. पहिल्या दोन सामन्यात शून्यावर बाद झाल्यानंतर अभिषेक सर्वांचं लक्ष वेधून घेत होता, परंतु नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात आर्यन दत्तनं टाकलेल्या अवघ्या तीन चेंडू खेळून तो शून्यावर पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याच्या बाद झाल्यानंतर अभिषेकच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसत होती आणि तो नकोशा यादीतही सामील झाला आहे.अभिषेक शर्मानं केला लाजिरवाणा विक्रम : अभिषेक शर्मानं आता टी–२० विश्वचषकाच्या एकाच हंगामात सर्वाधिक शून्यावर बाद होण्याचा विक्रम केला आहे, जो स्पर्धेत कोणत्याही भारतीय खेळाडूचा मागील कोणताही विक्रम मागे टाकलं आहे. याव्यतिरिक्त, अभिषेक शर्मानं टी–२० विश्वचषकात सर्वाधिक तीनवेळा शून्यावर बाद झालेल्या आशिष नेहराची बरोबरी केली आहे.





### पाकिस्तानच्या डगआउटमध्ये राडा, सलमान आणि हेड कोचमध्ये जुंपली, बॉटल फेकून

कराची ।:टी२० वर्ल्ड कप २०२६ मध्ये पाकिस्तान विरुद्ध नामिबिया यांच्यात ग्रुप स्टेजचा सामना बुधवारी १८ फेब्रुवारी रोजी खेळवला गेला होता. पाकिस्तानने ग्रुप स्टेजमधील शेवटच्या सामन्यात नामिबियाला तब्बल १०२ धावांनी पराभूत करून पाकिस्तानचा संघ सुपर ८ च्या फेरीत पोहोचलाय. पाकिस्तानने नामिबियाला विजयासाठी २०० धावांचे आव्हान दिले होते. मात्र हे आव्हान पूर्ण करण्यात नामिबिया अयशस्वी ठरली आणि ते १७.३ ओव्हरमध्ये ऑलआउट झाले. मात्र या सामन्यादरम्यानचा एक व्हिडीओ समोर येतोय ज्यात डकआउटमध्ये पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगा आणि हेड कोच माईक हेसन यांच्यात शाब्दिक जुंपली. यावेळी रागात सलमानने बॉटल सुद्धा फेकली.

## जर्सी बदलली तरी पुन्हा तोच मुर्खपणा, मॅचविनर ठरला टीम इंडियासाठी डोकेदुखी

नवी दिल्ली–टी२० वर्ल्ड कपच्या २०२६ च्या ग्रुप स्टेजमधला भारताचा शेवटचा सामना हा नेदरलँड विरूद्ध सूरू आहे. या सामन्यात टीम इंडियाचा सलामीवीर अभिषेक शर्मा पुन्हा डकवर बाद झाला आहे.मागच्या तीन सामन्यापासून तो शुन्यावर बाद होत आहे.आजच्या सामन्यात त्याने मोहम्मद सिराजची जर्सी घालून फलंदाजी करण्याचा प्रयत्न केला. पण तरी देखील ३ बॉलमध्ये शून्य धावा करून बाद झाला होता. त्यामुळे जर्सी बदलली तरी नशीब राहिलं असं काहीसं अभिषेक सोबत घडलं आहे. विशेष म्हणजे टी२० वर्ल्डकपमध्ये तो सर्वाधिक वेळा डक वर आऊट होणारा खेळाडू ठरला आहे.

खरं तर टी२० वर्ल्ड कप आधी अभिषेक शर्माला सर्वात मोठा मॅचविनर आणि धोकादायक खेळाडू म्हणून पाहिले जात होते. पण वर्ल्ड कपमध्ये हा खेळाडू पूर्णपणे फ्लॉप ठरला आहे. कारण युएसविरूद्ध पहिल्या सामन्यात अभिषेक शर्मा डकवर बाद झाला होता. त्यानंतर नामिबिया विरूद्ध सामन्याआधी अभिषेकच पोट बिघडल्यामुळे त्याला सामन्यात विश्रांती देण्यात आली होती. त्यानंतर पाकिस्तान विरूद्ध तो पुन्हा मैदानात आला. पण पाकिस्तानविरूद्ध देखील तो शुन्यावर बाद झाला.

त्यानंतर आजच्या सामन्यात देखील नामिबिया विरूद्ध तो शुन्यावर बाद झाला आहे. खरं तर आजच्या सामन्यात मैदानात फलंदाजीला उतरण्यापूर्वी त्याने पहिल्यांदा अर्शदिपची जर्सी घातली.पण अर्शदिप प्लेइंग इलेव्हनमध्ये असल्याने ती काढून मोहम्मद सिराजची काढली.अशाप्रकारे त्याने नशीब आजमावण्याचा प्रयत्न केला. पण तो पुन्हा शुन्यावर बाद झाला आहे. वर्ल्डकप मध्ये तिसऱ्यांदा असं झालंय की अभिषेक शर्मा शुन्यावर बाद झाला आहे.

दरम्यान अभिषेक शर्माने आता भारतासाठी एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक (५) वेळा डकवर आऊट झाला आहे. २०२४ मध्ये संजू सॅमसन देखील इतक्याच वेळ बाद झाला होता. टी२० मध्ये एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक डक (६) करणारे सलामीवीर

सैम अयुब (पाकिस्तान, २०२५)

५ – चालोएमवोंग चटफाईसन (थायलंड, २०२४)

५ – कुशल भुर्तेल (नेपाळ, २०२४)

५ – धर्मा केसुमा (इंडोनेशिया, २०२५)

५ – परवेझ हुसेन इमोन (बांगलादेश, २०२५)

५ – अभिषेक शर्मा (भारत, २०२६)

## दक्षिण आफ्रिकेचा युएईवर विजय, डेवाल्ड ब्रेविसची झंझावात खेळी

अहमदाबाद– टी–२० विश्वचषकातील महत्त्वाच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने संयुक्त अरब अमिरातीचा ६ गड्यांनी पराभव करत आपला दबदबा कायम राखला आहे. प्रथम फलंदाजी करताना युएईने दिलेल्या १२३ धावांच्या आव्हानाचा दक्षिण आफ्रिकेने केवळ १३.२ षटकांत पाठलाग पूर्ण केला.प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या युएईची सुरुवात अडखळत झाली. कर्णधार मुहम्मद वसीमने १२ चेंडूत २२ धावा करून आक्रमक पवित्रा घेतला खरा, पण दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजीसमोर युएईचा मध्यक्रम कोलमडला. अलिशान शराफूने सर्वाधिक ४५ धावा (३८ चेंडू) करून संघाला १२२ धावांपर्यंत पोहोचवले. दक्षिण आफ्रिकेकडून कॉर्बिन बॉशने केवळ १२ धावा देऊन ३ बळी टिपले, तर एनरिक नॉर्ट्जेने २ गडी बाद केले.१२३ धावांचे छोटे आव्हान गाठताना दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी सुरुवातीपासूनच फटकेबाजी केली. कर्णधार एडन मार्करामने केवळ ११ चेंडूत २८ धावा (५ चौकार, १ षटकार) कुटून आक्रमक सुरुवात करून दिली. डेवाल्ड ब्रेविसने २५ चेंडूत ३६ धावांची खेळी केली, ज्यामध्ये ३ उत्तुंग षटकारांचा समावेश होता. रायन रिकेल्टनने सुद्धा १६ चेंडूत वेगवान ३० धावांचे योगदान दिले. युएईच्या गोलंदाजांनी पुनरागमनाचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत सामना आफ्रिकेच्या बाजूने झुकला होता. ट्रिस्टन स्टब्स आणि जेसन स्मिथ यांनी उर्वरित धावा पूर्ण करून विजयावर शिक्कामोर्तब केले.

### ६७ वर्षांचे स्वप्न पूर्ण झाले! रणजी ट्रॉफीच्या फायनलमध्ये पोहोचून जम्मू कश्मीर टीमने रचला इतिहास, मोहम्मद शमी एकटा नडला

जम्मू–जम्मू आणि काश्मीर क्रिकेट टीमने रणजी ट्रॉफीच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नाव कोरले आहे. बलाढ्य बंगालचा पराभव करत त्यांनी पहिल्यांदाच या प्रतिष्ठेच्या स्पर्धेच्या फायनलमध्ये धडक मारली असून, संपूर्ण क्रिकेट जगतात त्यांचे कौतुक होत आहे. सेमीफायनलच्या चौथ्या दिवशी अवघ्या १२६ रन्सचे लक्ष पार करत त्यांनी हा ऐतिहासिक विजय मिळवला. हिमालयीन पट्ट्यातील फायनल गाठणारी ही पहिलीच टीम ठरली आहे.या विजयाचा खरा शिल्पकार आकिब नबी ठरला असून, त्याने या मॅचमध्ये एकूण ९ विकेट्स घेतल्या. त्याने पहिल्या इनिंगमध्ये ५ विकेट्स घेत बंगालचे कंबरडे मोडले.



अफगाणिस्तानातील बामियान प्रांतात स्की स्पर्धेत सहभागी होणारे अफगाण स्की उत्साही.

## दोन विकेट पडल्या अन् गंभीर मैदानात आला, सूर्याने पुढच्याच बॉलला बदलला गेम प्लान!

अहमदाबाद–टी–२० वर्ल्ड कपमध्ये नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात टीम इंडियाची खराब सुरूवात झाली. ओपनर अभिषेक शर्मा हा पुन्हा एकदा शून्य रनवर आऊट झाला. यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये अभिषेक शर्मा ३ मॅच खेळला आहे, यातल्या सगळ्या ३ सामन्यांमध्ये अभिषेक शून्य रनवर माघारी परतला. वर्ल्ड कपच्या पहिल्या ३ इनिंगमध्ये शून्य रनवर आऊट होणारा अभिषेक पहिलाच खेळाडू ठरला आहे.

अभिषेकची विकेट गेल्यानंतर टीम इंडियाचा दुसरा ओपनर इशान किशन ७ बॉलमध्ये १८ रन करून माघारी परतला. अभिषेक आणि इशान या दोघांची विकेट आर्यन दत्तने घेतली. अभिषेक आणि इशानची विकेट गेल्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांनी टीम इंडियाचा डाव सावरायला सुरूवात केली.

सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांनी पॉवर प्लेच्या ६ ओव्हरपर्यंत भारताचा स्कोअर ५१ रनपर्यंत नेला. पॉवर प्ले संपल्यानंतर झालेल्या ड्रिंक्स ब्रेकमध्ये अखेर टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि १२ वा खेळाडू मोहम्मद सिराज मैदानात आले. यावेळी गौतम गंभीरने कर्णधार सूर्यकुमार यादवसोबत चर्चा केली.

गौतम गंभीर मैदानातून गेल्यानंतर टीम इंडियाने पुढच्या काही ओव्हरमध्ये सावध बॅटिंग केली. भारताने ७ व्या ओव्हरमध्ये ५ रन, ८ व्या ओव्हरमध्ये ४ रन, ९व्या ओव्हरमध्ये ९ रन आणि १० व्या ओव्हरमध्ये ५ रन काढले. पुन्हा ११ व्या ओव्हरमध्ये टीम इंडियाला फक्त २ रनच काढता आले. १२ व्या ओव्हरनंतर टीम इंडियाने पुन्हा गिअर बदलला. १२ व्या ओव्हरमध्ये भारताने १३ रन आणि १३ व्या ओव्हरमध्ये १९ रन काढल्या.

याआधी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यातही गौतम गंभीरने डग आऊटमधून सूर्यकुमार यादवसाठी मेसेज पाठवला होता. शेवटपर्यंत मैदानात राहा, असं गौतम गंभीरने आपल्याला सांगितल्याचं स्वत: सूर्यकुमार यादव याने पाकिस्तानविरुद्धच्या मॅचनंतर सांगितलं होतं. आता नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यातही पहिल्या दोन विकेट लवकर गेल्यानंतर गंभीरने सूर्याला टिकून खेळायला सांगितल्याची शक्यता आहे. टी–२० वर्ल्ड कपच्या युएसए, नामिबिया आणि पाकिस्तानविरुद्धच्या ग्रुप स्टेजच्या सामन्यात भारतीय टीमचा दणदणीत विजय झाला, त्यामुळे टीम इंडिया आधीच सुपर–८ मध्ये पोहोचली



आहे. सुपर–८ मध्ये भारताचे सामने दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजविरुद्ध होणार आहेत. सुपर–८ च्या या सामन्यांआधी अभिषेक शर्माचा फॉर्म हा टीम इंडियासाठी चिंतेचा विषय ठरला आहे.

२०२६ या वर्षात अभिषेक शर्माच्या नावावर ५ डक आहेत. जी ओपनरची टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासातली दुसरी सगळ्यात खराब कामगिरी आहे. पाकिस्तानचा सॅम अयुब हा टी–२० आंतरराष्ट्रीय मध्ये एका वर्षात सर्वाधिकवेळा शून्य रनवर आऊट होणारा ओपनर आहे. सॅम अयुब २०२५ मध्ये ६ वेळा शून्य रनवर आऊट झाला होता.

## कलाधिराज प्रतिष्ठानच्या वतीने लातूरच्या पूर्व भागात शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ चा जल्लोष; तीन दिवस विविध कार्यक्रमांची रेलचेल

**लातूर/प्रतिनिधी :** येथील छत्रपती शाहू महाराज चौक परिसरात कलाधिराज प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित पूर्व भाग शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. १७ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या सोहळ्यात सांस्कृतिक कार्यक्रमांसह भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक सतीश राजेंद्र करंडे यांनी दिली आहे.

या तीन दिवसीय उत्सवाचा प्रारंभ १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७:०० वाजता दिमाखदार मशाल आगमनाने होईल. त्यानंतर १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५:०० वाजता मूर्ती दर्शन सोहळा पार पडेल आणि सायंकाळी ७:०० वाजता शिवप्रेमींसाठी लोकरंग या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्य दिन विशेष म्हणजे १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:०० वाजता महाराजांना अभिवादन करण्यात येईल आणि दुपारी २:०० वाजता भव्य शोभा यात्रेला प्रारंभ होईल. या शोभायात्रेने लातूरचा पूर्व भाग शिवमय होणार आहे.या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी मार्गदर्शक कुलदीप सूर्यवंशी, ॲड. किशोर शिंदे, जुगलकिशोर तोष्णीवाल, भैय्यासाहेब वाघमारे, वैभव काका सूर्यवंशी आणि किरण स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली समिती काम करत आहे. सोहळ्याचे अध्यक्षपद वैशालीताई पाटील भूषवत असून स्वागतअध्यक्ष म्हणून रविकांत भैय्या चव्हाण, कार्याध्यक्ष रवींद्र डोंगरे, तर सचिव म्हणून सुदर्शन घाडगे व आशुतोष कांबळे जबाबदारी पार पाडत आहेत.

मिरवणुकीचे विशेष नियोजन मिरवणूक प्रमुख गणेशजी जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे. या सोहळ्यात लातूरमधील जास्तीत जास्त शिवप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन कलाधिराज प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# तालमणी डॉ राम बोरगावकर यांना संगीत शंकर दरबार जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**लातूर/प्रतिनिधी :** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने माजी केंद्रीय गृहमंत्री व माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण आणि कै.सौ.कुसुमताई चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी संगीत क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंताला ''संगीत शंकर दरबार जीवन गौरव पुरस्कार''दिला जातो.

यावर्षीच्या या मानाच्या पुरस्कारासाठी जेष्ठ संगीततज्ञ तालमणी डॉ. राम बोरगावकर (लातूर) यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. रोख रक्कम, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, शाल,श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

तालमणी डॉ.राम बोरगावकर हे गेली पाच दशके मराठवाडा संगीत कला अकादमी व रिसर्च सेंटर,सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूर या संस्थांच्या माध्यमातून संगीत कलेच्या क्षेत्रात संगीत साधना,प्रचार व संगीत प्रसाराचे, संशोधनाचे काम करत आहेत. अवघ्या २४ व्या वर्षी देशभरातून सर्वाधिक गुण घेऊन विशेष प्राविण्याने तालशास्त्रात डॉक्टरेक्ट मिळविणारे ते मराठवाड्यातील पहिले तबलावादक आहेत. उदयोन्मुख कलावंतांना व्यासपीठ मिळावे या उदात्त



हेतूने त्यांनी अखंड संगीत महायज्ञाची संकल्पना मांडली आणि गेल्या १७ वर्षापासून ते हे कार्य करत आहेत. अद्यापपर्यंत त्यांनी संगीत क्षेत्रातील हजारो शिष्यांना घडविले आहे.डॉ.राम बोरगावकर हे ऑल इंडिया रेडिओ आणि टीव्हीचे 'ए' ग्रेड कलावंत आहेत.

आंतरराष्ट्रीय संगीत संमेलन,मलेशिया, इंटरनॅशनल रोटरी क्लब संगीत संमेलन कोलंबो,श्रीलंका येथे त्यांनी आपली कला सादर केली आहे.याबरोबरच दुबई,युक्रेन,इंडोनेशिया,श्रीलंका, दोहा, कतार, व्हिएतनाम अशा विविध देशात त्यांनी संगीत क्षेत्रात जागतिक मंचावर भारताचे प्रतिनिधीत्व केले.संगीत विषयातील पीएच. डी. चे संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून ते आजही कार्य करत आहेत. याबरोबरच मराठवाड्यातील कलावंतांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी त्यांनी मुंबई येथे दोन वेळा मराठवाडा संगीत संमेलनाचे आयोजन केले आहे.त्यांच्या या कार्याची दखल घेत यापूर्वी महाराष्ट्र शासनाने त्यांना 'राज्य सांस्कृतिक पुरस्काराने' गौरविले आहे.

महत्त्वाचे कार्य

मराठवाडा संगीत कला अकादमी व रिसर्च सेंटर चे अध्यक्ष

सरस्वती संगीत कला महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष

आंतरराष्ट्रीय सवाई गंधर्व महोत्सवात गेल्या १४ वर्षापासून सातत्याने हजेरी लावली.

पद्मविभूषण प्रभा अत्रे,पद्मश्री शोभा गुर्टू, जितेंद्र अभिषेकी, पं.भीमसेन जोशी, गझल गायक भीमराव पांचाळे,गानसरस्वती किशोरीताई आमोणकर,पं.भीमसेन जोशी आदी जगविख्यात कलावंतांना त्यांनी साथसंगत केली आहे.

डॉ.राम बोरगावकर यांनी महाराष्ट्र शासनाच्या पु. ल.देशपांडे सांस्कृतिक समितीवर सदस्य म्हणून प्रदीर्घकाळ काम केले आहे.

'संगीत शंकर दरबार जीवन गौरव पुरस्कार' बुधवार दि २५ फेब्रुवारी २०२६ रोजी कुसुम सभागृह, नांदेड येथे 'कुसुम महोत्सवात ' डॉ.राम बोरगावकर यांना प्रदान केला जाणार आहे. या पुरस्काराच्या घोषणेनंतर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोकरावजी चव्हाण साहेब,माजी मंत्री डी. पी.सावंत साहेब,श्रीमती अमिताताई चव्हाण,आमदार श्रीजया चव्हाण,श्री. तुकारामभैया पाटील,प्रा.शिवराज मोटेगावकर,श्री.द्वारकादास शामकुमार ,श्री.रमेशजी बिरादार,डॉ.कल्याण बरमदे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. याबरोबरच मराठवाड्यातील ज्येष्ठ संगीत कलावंतांनीही त्यांचे अभिनंदन केले आहे.

# सभ्य आणि सुसंस्कृत समाज निर्माण झाला पाहिजे –डॉ. नागोराव कुंभार

### कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर व्याख्यानमाला

**निलंगा/आयुब बागवान :** माणूस घडविण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण परंतु आज याकडे मात्र उद्योग म्हणून पाहिले जाते, हे थांबले पाहिजे. निष्ठा व कर्मभावानेने प्रत्येक व्यक्तीने काम केले तर ही परिस्थिती बदलू शकते. विद्यार्थ्यांना वैचारिक आधार व दिशा देण्याचे काम शिक्षकच करू शकतात. आपल्या अवतीभवती काय आहे ते समजून घ्यावे, तज्ञ लोकांशी संवाद साधावा, भरपूर वाचन करावे, वाचून/ ऐकून जे ज्ञान मिळवले त्याचे चिंतन करावे ही ज्ञानाची साधने तरुण पिढीला समजून सांगितली पाहिजे. विद्यार्थ्यांची क्षमता लक्षात घेऊन त्यानुसार त्यांना ज्ञान दिले पाहिजे, तरच सभ्य आणि सुसंस्कृत समाज निर्माण होईल असे परखड मत थोर विचारवंत, शिक्षणतज्ञ डॉ. नागोराव कुंभार यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेबांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते, या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंपताना डॉ.नागोराव कुंभार यांनी हे मत व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, तरुण पिढीशी संवाद झाला तरच त्यांच्यावर चांगले संस्कार होऊ शकतात. ज्ञान, शहाणपणा, आत्मविश्वास, संयम हे



सद्गुण प्रत्येकात आवश्यक आहेत हे तरुण पिढीला सांगावे लागतील.

कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेबांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कर्मवीर कदम यांची उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती विकसित झाली पाहिजे असे मत व्यक्त केले. शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान नाही तर व्यक्तिमत्व विकासाची प्रणाली आहे असेही ते म्हणाले. याप्रसंगी विचार मंचावर महाराष्ट्र शिक्षण समितीचे समन्वयक श्री. दिलीपराव धुमाळ, महाराष्ट्र औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ, महाराष्ट्र पॉलिटेक्निक डी फार्मसीचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर पाटील, महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मोहन नटवे, महाराष्ट्र प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक श्री. लिंबराज मलिले, महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. नरेश पिनमकर, डॉ. गोविंद शिवशेट्टे यांनी तर आभार डॉ. हंसराज भोसले यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शिक्षण समिती संकुलातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उदयगिरीच्या तीन विद्यार्थ्यांना प्लेसमेंट तर अकरा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**उदगीर/प्रतिनिधी : :** किरण अकॅडमी आयटी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट, पुणे व संगणकशास्त्र विभाग महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६ फेब्रुवारी २०१६ रोजी ऑनलाईन ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले.त्यात बीसीएटीवाय आणि बीएस्सीटीवाय च्या ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अकॅडमी तर्फे जनरल ॲपटीट्यूड टेस्ट, ग्रुप डिस्कशन व पर्सनल इंटरव्यू घेण्यात आले, त्यातून तीन विद्यार्थिनी कु. केंद्रे राजनंदिनी, कु. मुंडे वैष्णवी आणि कु. स्वामी सुषमा सुशील यांची ट्रेनिंग व प्लेसमेंट साठी निवड झाली. अकरा विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप साठी निवड करण्यात आली.

यशस्वी विद्यार्थ्यांची प्लेसमेंट मध्ये निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. व्ही. आवाळे, प्रा. राहुल बिरादार तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# 'शाश्वत शेतीसाठी पिकपैदास' : विषयावर दयानंद विज्ञान महाविद्यालय येथे परिसंवाद

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि. १७.०२.२०२६ रोजी वनस्पतीशास्त्र विभागातर्फे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ''शाश्वत शेतीसाठी पिकपैदास'' या विषयावर व्याखान आयोजित करण्यात आलेले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.जे.ए.अंगुलवार तर प्रमुख वक्ते म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.रा.च.महाजन उपस्थित होते.

यावेळी डॉ.राजेश महाजन यांनी कधी काळी अन्नधान्न आयात करणारा भारत आज या बाबतीत स्वयंपूर्ण असून तो अन्नधान्य व कृषी उत्पादने निर्यात करत असून या कामी असलेल्या पिकपैदासकारांचे मोठे योगदान असल्याचे आवर्जून



नमूद केले.

अन्नधान्य उत्पादनात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या पिक फुलाबाबत बोलताना ते म्हणाले की, ''गुलाबाच्या फुलापेक्षाही ज्वारीचे फुल अधिक सुंदर'' आधुनिक भारतात, जैवशास्त्रातील आधुनिक आयुधे घेवून जनरेशन ४ पिकपैदासकार येणाऱ्या २०५० च्या लोकसंख्येला पुरेल इतके धान्य पिकवण्यास सज्ज आहे हे विशद करुन येणाऱ्या भावी शात्रज्ञांना या क्षेत्रात येण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी महाविद्यालयात आयोजित ''वनस्पती रेखाचित्र'' स्पर्धेतील विजेत्यांना प्रमुख पाहुणे व मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक डॉ.प्रमोद माने यांनी केले. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागातील विभाग प्रमुख डॉ.सी.एस.स्वामी तसेच प्रा.शिवाजी आळणे,डॉ. मनीषा गुरमे, प्रा.ए.एस.कांबळे , प्रा.व्ही. व्ही. हवालदार, डॉ.ए.ए. बिडकर , प्रा.आऊ इळीकर, प्रयोगशाळा सहाय्यक पुजा पाटील, प्रयोगशाळा परिचर एन. डी.भालेराव , आर.व्ही. सलगर, एन.आर.बाहेती, संतोष राक्षे, आशिष इंगळे तसेच राजू पांचाळ यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छत्रबंध शिवानी यांनी केले तर साधन व्यक्तीचा परिचय राजलक्ष्मी वाघमारे यांनी केला. शेवटी प्रा. एन.आर.सुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# लातूरमध्ये महा निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्राच्या विकासाला चालना देणे आणि निर्यात वृद्धीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या महा निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ अंतर्गत लातूर येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून उद्योग मित्र हॉल येथे आयोजित या कार्यशाळेला मैत्री कक्षाच्या अपर जिल्हाधिकारी मनिषा कुंभार, लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी गणेश पवार, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील, कौशल्य विकास विभागाचे श्री. सुर्यवंशी यावेळी उपस्थित होते.









प्रास्ताविक जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्री. पाटील यांनी केले. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील उद्योजकता आणि निर्यात वाढीसाठी शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची माहिती दिली.

उपजिल्हाधिकारी श्री. पवार यांनी लातूर जिल्ह्यात सोयाबीन उत्पादने, दाळ, साखर इत्यादी कृषीजन्य उत्पादनांची निर्यात होत असल्याचे सांगितले. तसेच उद्योग घटकांकडून प्रक्रिया केलेल्या मूल्यवर्धित उत्पादनांची निर्यात वाढवणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन केले.

मैत्री कक्ष कक्षाच्या अपर जिल्हाधिकारी श्रीमती कुंभार यांनी मैत्री पोर्टलवर एकूण १४५ सेवा आणि १७ विविध विभागांच्या सेवा व परवानग्या उपलब्ध असल्याची माहिती दिली. उद्योजकांनी या पोर्टलचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कौशल्य विकास विभागाचे श्री. सुर्यवंशी यांनी लातूर जिल्ह्यातील उद्योगांसाठी पूरक कुशल मनुष्यबळ तयार करण्याचे काम उद्योजकांच्या सहकार्याने सुरू असल्याचे सांगितले. निर्यात सल्लागार श्री. सुरज ढगे यांनी ऑनलाइन निर्यात परवाने, निर्यात धोरण २०२३ आणि संबंधित प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली.

बँक ऑफ इंडियाचे श्री. पवार आणि जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक श्री. आठवले यांनी बँकांच्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच टपाल कार्यालयाचे श्री. सोनटक्के आणि इंडिया इन्शुरन्सचे श्री. राठोड यांनी आयात-निर्यात कार्यपद्धती सोप्या भाषेत समजावून सांगितली. जास्तीत जास्त परकीय चलन मिळवण्यासाठी निर्यातीकडे वळण्याचे आवाहन त्यांनी केले.

# जनकल्याण निवासी विद्यालयास राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**लातूर/प्रतिनिधी :** ज्ञान प्रबोधिनी छात्र प्रबोधन व मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सांघिक हस्तलिखित व अभिवाचन स्पर्धा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला. या स्पर्धेतील अभिवाचन प्रकारात जनकल्याण निवासी विद्यालय येथील ''सौंदर्य'' गटाने उत्कृष्ट सादरीकरण करत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.


या गटात वैष्णवी बालाजी बिरादार, समृद्धी उत्तम पाटील, प्रणाली प्रकाश थोरबोले, सृष्टी नवनाथ खोडसे, अनुष्का अमोल ठोंबरे, समृद्धी दत्ता चौधरी, गायत्री सुनील रोडगे, अस्मिता अविनाश कुकडे व नेहा अशोक धायगुडे या विद्यार्थिनी सहभागी होत्या. या विद्यार्थिनींना श्री. सागर कद्रे व सौ. संगीता भदाडे यांचे मार्गदर्शन लाभले.





या यशाबद्दल प्रकल्प अध्यक्ष श्री. प्रकाशजी लातूरे, प्रकल्प कार्यवाह श्री. राजेशजी सुगरे, शालेय समिती अध्यक्ष श्री. सतीशजी कुलकर्णी, वसतिगृह समिती अध्यक्ष श्री. प्रशांतजी मेतकुटे, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर सोनटक्के, अधीक्षक श्री. दत्ता माने व सहअधीक्षक श्री. बाबासाहेब मते यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.





शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# 'गौरव गाथा शिवरायांची' कार्यक्रमातून मांडला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास !

## 'आम्ही जिजाऊच्या लेकी' कार्यक्रमात शाहिरी पोवाडे, स्फूर्तीगीतांचे सादरीकरण
## सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने आयोजन

**लातूर/प्रतिनिधी** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने दयानंद सभागृह येथे सांस्कृतिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'गौरव गाथा शिवरायांची' या कार्यक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंग रंगमंचावर साकारण्यात आले. त्यापूर्वी सादर झालेल्या 'आम्ही जिजाऊच्या लेकी' या कार्यक्रमात शाहिरी पोवाडे आणि स्फूर्तीगीतांचे सादरीकरण करण्यात आले.




कार्यक्रमाचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सायली ठाकूर, तहसीलदार संतोष बनकर, जिल्हा परिषद सदस्य प्रतिक्षाताई गुट्टे, उत्तमराव माने, अश्विन नगराळे, प्रफुल्ल गुंडरे, साईताई गोरे, तुळसाबाई लोंढे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी 'आम्ही जिजाऊच्या लेकी' हा कार्यक्रम सादर झाला. यात सहभागी कलाकारांनी राजमाता जिजाऊ, महाराणी सईबाई, महाराणी ताराबाई ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या इतिहासावर आधारित गीतांचे सादरीकरण केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणातील राजमाता जिजाऊंनी दिलेले संस्कार, स्वाभिमान आणि शौर्याची शिकवण याबाबत माहिती दिली.

'गौरव गाथा शिवरायांची' या मुख्य कार्यक्रमात कलाकारांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मापासून स्वराज्य स्थापनेपर्यंतच्या आणि इतर महत्त्वपूर्ण प्रसंगांचे रंगमंचीय सादरीकरण केले. प्रसंगानुरूप सादर केलेली स्फूर्तीगीते लक्षवेधी ठरली. या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांची गौरवगाथा, पराक्रम नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## जेईई मेन्स परीक्षेत राजमाता जिजामाता महाविद्यालयाचे यश

**लातूर/प्रतिनिधी** : राष्ट्रीय पातळीवरील आयआयटी व एनआयटी अशा प्रतिष्ठित अभियांत्रिकी कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी घेण्यात आलेल्या जेईई मेन्स या पहिल्या फेजच्या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला आहे. या परीक्षेत राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

सोनाली शरद पंचगल्ले ही विद्यार्थिनी ९४.०८ पर्सेंटाइल मार्क मिळवून महाविद्यालयात प्रथम, अनिकेत अशोक मस्के ९१.८७ पर्सेंटाइल मार्क मिळवून द्वितीय, तर विवेक मुकुंद भोसले हा विद्यार्थी ९१.४७ पर्सेंटाइल मार्क मिळवत तृतीय आला आहे. या परीक्षेत प्रथमेश कैलास नागरगोजे याने ९१.०७, सौम्या सौदागर काटे ८७, व्यंकटेश विजयकुमार लड्डा ८४.१८, साईप्रसाद मन्मथ हिंगमिरे ८१.३५, केदार सोमनाथ समशेट्टे ८० तर कृष्णा विजयकुमार किसवे याने ७० पर्सेंटाइल मार्क मिळवत यश संपादन केले आहे.

## श्रीमंत सम्राट ..

सुवर्ण मराठी माती
इथे जन्मले छत्रपती
आऊंची सुवर्ण कूस
दिलेस्वराज्याधिपती

राजे लख लख हिरा
आऊ कोंदणे शोभती
अखर्वात असा संगम
राजसौभाग्य लाभती

किल्ले जिंकले किती
सहजी पळवे आपत्ती
मनेही तशीचं जिंकून
प्रेमाची जपलीसंपत्ती

सुखी सुरक्षीत संपन्न
रयतेतील हरेकव्यक्ती
राजा सहिष्णू प्रेमळू
राहे मनमनाचे तख्ती

पोशिंदा पिकवीमोती
रोजगार प्रत्येक हाती
ढासळे भेदाच्याभिंती
नांदे अठरापगडजाती

जिवा भावाचे मावळे
भगव्या ध्वजाभोवती
आपुलकीचीअनुभूती
स्वराज्य वृक्षा रोवती

रयत अनमोल ऐश्वर्य
जुळली घनीष्ट नाती
काळही जाणीव ठेवे
उभारेअमुल्य कनाती

शिवजन्मोत्सव उर्जा
स्फुलिंग फुलले रक्ती
भगवा सावरता हाती
जाणवेआंतरिकशक्ती

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# लातूरला स्वतंत्र सोयाबीन संशोधन केंद्र व्हावे : अर्चना पाटील चाकूरकर

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्ह्यात स्वतंत्र सोयाबीन संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी विशेष अनुदान मंजूर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात अर्चना पाटिल चाकुरकर यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय कृषी व किसान कल्याण मंत्री मा. श्री. शिवराजसिंह चौहान यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले.



महाराष्ट्रात विशेषतः लातूर जिल्ह्यात सोयाबीन हे प्रमुख नगदी पीक बनले आहे. मात्र हवामान बदल, अनियमित पाऊस तसेच कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे उत्पादनात अपेक्षित वाढ होत नसल्याचे नमूद करण्यात आले. स्थानिक हवामान व मातीच्या परिस्थितीनुसार उच्च उत्पादक व रोगप्रतिकारक वाण विकसित करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी लातूरमध्ये स्वतंत्र संशोधन केंद्राची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले.

या प्रस्तावित केंद्रासाठी अंदाजे २५ कोटी रुपयांच्या विशेष निधीची गरज असून, केंद्र सरकारने या प्रस्तावावर सहानुभूतीपूर्वक विचार करून विशेष अनुदान मंजूर करावे, अशी आग्रही विनंती करण्यात आली आहे.

प्रस्तावित संशोधन केंद्रामुळे महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील तसेच लघुउद्योगाशी निगडित शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल. सोयाबीन उत्पादनात वाढ होऊन राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. लातूर व मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या सशक्त भविष्यासाठी हा निर्णय निर्णायक ठरेल, असे मतही यावेळी मांडण्यात आले.

## सरस्वती महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी** : येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत , स्फूर्तीस्थान , महापराक्रमी राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ राम बोरगावकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त
# २६ आणि २७ फेब्रुवारीला पशुपक्षी, अश्व-श्वान प्रदर्शन

**लातूर/प्रतिनिधी** : श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त यात्रा समिती, जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग व लातूर पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय परिसरात २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पशुपक्षी प्रदर्शन आणि २७ फेब्रुवारी २०२६ रोजी अश्व व श्वान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यासाठीची नोंदणी त्या-त्या दिवशी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत करण्यात येणार असून त्यानंतर निवड प्रक्रीया करण्यात येईल, असे लातूर पंचायत समितीमार्फत कळविण्यात आले आहे.

पशु प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांचे स्वास्थ दाखला प्रमाणपत्र घ्यावे. पशुप्रदर्शनातील सहभागी पशुधनांच्या कानात १२ अंकी पशु आधार नंबर असणे बंधनकारक राहील. पशुधन व श्वान, अश्व गटांची नोंदणी त्या-त्या दिवशी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंतच केली जाईल. कुठल्याही परिस्थितीत सकाळी ११ वाजल्यानंतर पशुधनाची नाव नोंदणी केली जाणार नाही. सकाळी ११ ते दुपारी ३ वा.पर्यंतची वेळ पशुधन निवडीसाठी राखीव राहील. प्रत्येक गटातील पशुधनास प्रथम, द्वितीय, तृतीय व ग्रेड नुसार अ, ब, क, ड अशा प्रकारे बक्षिस वितरीत करण्यात येईल. प्रत्येक गटात १० पशुधनाचा सहभाग बंधनकारक राहिल अन्यथा तो गट होणार नाही व त्या गटातील पशुधनास ग्रेड प्रमाणे अ, ब, क, ड या प्रमाणे बक्षिस वाटप करण्यात येईल.

सहभागी पशुपालकांना बक्षिसाची रक्कम संगणक प्रणाली आरटीजीएसद्वारे अदा करण्यात येईल. त्यासाठी नोंदणी करताना आधार कार्ड, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत देणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत बक्षिसाची रक्कम रोख स्वरुपात दिली जाणार नाही. पशुपालकांनी आपले बहुमुल्य पशुधन व्यवस्थित दोरखंडाने बांधून आपल्या जबाबदारीने ठेवावे. निवड प्रक्रिया पारदर्शक असून निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील. निवड समिती अधिकारी, कर्मचारी यांच्याशी हुज्जत अथवा वाद घालणे, यासारखा अनुचित प्रकार आढळल्यास संबंधित पशुपालकाची नोंदणी रद्द करण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत सर्वोत्तम पशुधन (चॅम्पियन) निवडला जाणार नाही, असे लातूर पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ. जे. पी. वाघमारे यांनी कळविले आहे.

प्रशु प्रदर्शनामध्ये खालील प्रमाणे गट स्थापन करण्यात येतील

देवणी नर गट-
देवणीनर १ वर्षाखालील वासरे, देवणीनर १ वर्षावरील वासरे, देवणीनर २ दात वळू, देवणीनर ४ दात वळू, देवणीनर ६ दात वळू.

देवणी मादी गट-
देवणी मादी १ वर्षाखालील वासरे, देवणी कालवड १ वर्षावरील, देवणी गाभण कालवड, देवणी गाभण गाय, देवणी दुधाळ गाय.

लाल कंधारी नर गट-
लालकंधारी नर १ वर्षाखालील वासरे, लालकंधारी नर १ वर्षावरील वासरे, लालकंधारी नर २ दात वळू, लालकंधारी नर ४ दात वळू, लालकंधारी नर ६ दात वळू.

लाल कंधारी मादी गट-
लालकंधारी मादी १ वर्षाखालील वासरे, लालकंधारी कालवड १ वर्षावरील, लालकंधरी गाभण कालवड, लालकंधारी गाभण गाय, लालकंधारी दुधाळ गाय.

संकरीत मादी गट-
संकरीत मादी १ वर्षाखालील वासरे, संकरीत कालवड १ वर्षावरील, संकरीत गाभण गाय, संकरीत दुधाळ गाय.

म्हैस गट-
नर, मादी

अश्व गट नर-
अदात, २ दातावरील.

अश्व मादी गट-
अदात, २ दातावरील.

श्वान गट-
प्रजातनिहाय

कुक्कुट गट-
देशी कोंबडी
विदेशी कोंबडी

उस्मानाबादी शेळी गट-
तीन पिल्ले व त्यावरील पिल्लांची उस्मानाबादी शेळी.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. **१.निविदा सूचना क्रमांक:** ०३-२०२६-SrDENS **कामाचे नाव:** 1. KWV-MRJ विभागात LC २२,२४,३१,४९ वरील संपर्क रस्त्याची सुधारणा आणि KWV-MRJ विभागात LC ७० वर मानक उंची गेजची तरतूद २. SUR-WD विभागात LC ६१,७४,८२,९१,३ वरील संपर्क रस्त्याची सुधारणा आणि SUR-WD विभागात LC ८२, ९१ आणि ३ वर मानक उंची गेजची तरतूद. ३. Sr.DEN(S) विभागात रस्ते वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेसाठी गेट लॉज आणि इतर विविध कामांमध्ये सुधारणा. **कामाची अंदाजे किंमत:** रु. १,१२,६१,६५८.४० **बयाणा रक्कम:** रु. २,०६,३००.०० **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** ६ महिने **देखभाल कालावधी:** १२ महिने **निविदा सूचना क्रमांक:** ०४-२०२६- एसआरडीईएनएस **कामाचे नाव:** एडीईएन/केएलबीजी उपविभागाच्या एमआर-एसडीबी विभागादरम्यान किमी ५८७/९०० - ५८९/४६० = १५६० मीटर (वरच्या बाजूने) पासून रिटेनिंग वॉल आणि साइड ड्रेनचे बांधकाम **कामाची अंदाजे किंमत:** रु. ३,८७,६६,७२२.४३ **बयाणा रक्कम:** रु. ३,४३,८००.०० **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने **देखभाल कालावधी:** ६ महिने **www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ:** ०९/०३/२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** ०९/०३/२०२६ रोजी १५:३० वाजेपर्यंत संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: **www.ireps.gov.in.**

ANJ-15

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. १. **निविदा सूचना क्रमांक:** ०२-२०२६-एसआरडीईएनसी **कामाचे नाव:** 1) टीआरआर(पी) - केडब्ल्यूव्ही-एमआरजे विभागात ३२.७०५ किमी, सीनियर डीईएन(सी) विभागात केडब्ल्यूव्ही-एलयूआर विभागात १५ किमी आणि सोलापूर विभागात टीएफआर ३९.८ किमी. २) भिगवण स्थानकावर बॅलास्ट साइडिंगचा विस्तार आणि सीनियर डीईएन(सी) विभागात कवठेमहांकाळ स्थानकावर नवीन बॅलास्ट साइडिंगची निर्मिती **कामाची अंदाजे किंमत:** ५,८५,९५,०६७.१७ **बयाणा रक्कम:** रु. ४,४३,०००.०० **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १८ महिने **देखभाल कालावधी: निविदा सूचना क्रमांक:** ०३-२०२६-एसआरडीईएनसी कामाचे नाव: दरमहा १५०० किमी अंतरासाठी पी वे मटेरियलच्या वाहतुकीसाठी १० मेट्रिक टन क्षमतेचे ट्रक भाड्याने घेणे 1) एसएसई/पी.वे/जेएच आणि केडब्ल्यूव्ही(एन) ADEN/KWV(BG) अंतर्गत, २) एसएसई/पी.वे/एलयूआर आणि बीटीडब्ल्यू ADEN/LUR अंतर्गत आणि ३) एसएसई/पी.वे/पीव्हीआर आणि एमआरजे ADEN/PVR अंतर्गत २ वर्षांच्या कालावधीसाठी सोलापूर विभागात सीनियर डीईएन/सी/एसयूआर विभाग अंतर्गत (२ वर्षांच्या कालावधीसाठी १० मेट्रिक टन क्षमतेचे एकूण ०६ ट्रक). **कामाची अंदाजे किंमत:** १,४७,२१,२३७.५१ **बकाया रक्कम:** रु. २,२३,६००.०० **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** २४ महिने **देखभाल कालावधी:** शून्य **www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** ११/०३/२०२६ रोजी १५:३० वाजता संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: **www.ireps.gov.in.**

ANJ-16

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.


# हरित ऊर्जा क्षेत्रात राज्यात मोठी गुंतवणूक,
## हरित ऊर्जेमुळे वीजदरात कपात
### महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांचे प्रतिपादन

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील वीजवापरामध्ये नवीकरणीय अथवा हरित ऊर्जेचे प्रमाण सध्याच्या १३ टक्क्यांवरून २०३० पर्यंत ५२ टक्क्यांवर नेण्यात येणार असून हरित ऊर्जेवर भर दिल्यामुळे आगामी पाच वर्षांसाठी विजेचे दर कमी करणे शक्य झाले आहे. राज्यात हरित ऊर्जा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खासगी गुंतवणूक येत आहे, असे प्रतिपादन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी बुधवारी मुंबई येथे केले.

मुंबई एनर्जी वीकच्या अंतर्गत महाराष्ट्रातील हरित ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक या विषयावरील चर्चासत्रात मुख्य भाषण करताना ते बोलत होते.




त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निश्चित केलेल्या नेट झिरोच्या उद्दीष्टानुसार नवीकरणीय ऊर्जेच्या वापराचे प्रमाण २०३० पर्यंत ५० टक्क्यांपर्यंत वाढविणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात अंमलात आणलेल्या ऊर्जा परिवर्तन आराखड्यामुळे राज्यातील नवीकरणीय ऊर्जावापराचे प्रमाण या कालावधीत ५२ टक्क्यांवर जाईल. मा. पंतप्रधानांनी देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी जे स्वप्न पाहिले आहे त्यानुसार मा. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन डॉलर्सची करण्यात येणार आहे. अर्थव्यवस्थेचा झपाट्याने विस्तार होत असताना राज्याची ऊर्जेची गरज किती वाढेल, हे ध्यानात घेऊन संसाधन पर्याप्तता आराखडा तयार केला आहे.

आगामी पाच वर्षात राज्यात ऊर्जा परिवर्तन आराखड्यासाठी ३.३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यापैकी ७५ टक्के गुंतवणूक ही खासगी गुंतवणूकदारांकडून होत आहे. ऊर्जा परिवर्तनामध्ये हरित ऊर्जेवर भर देण्यात येत आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत असून ती योग्य धोरणांचे निदर्शक आहे. हरित ऊर्जा स्वस्तात मिळत असल्याने महावितरणची आगामी पाच वर्षात वीज खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात बचत होणार असून त्यामुळेच कंपनीला राज्यात पाच वर्षांसाठी वीजदर कपातीचा प्रस्ताव मांडता आला आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

ते म्हणाले की, राज्यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचे प्रमाण वाढत असून त्यांच्या चार्जिंगसाठी मोठ्या प्रमाणात सुविधांची गरज भासेल. राज्यात मोठ्या प्रमाणात डेटा सेंटर उभारण्यात येत आहेत. तसेच हरित हायड्रोजनचे प्रकल्पही उभारण्यात येणार आहेत. या सर्वांसाठी मोठ्या प्रमाणात वीज लागेल व त्याची तरतूद महावितरणने केली आहे.

त्यांनी सांगितले की, दिवसा तयार झालेल्या सौर ऊर्जेचा वापर सायंकाळी विजेच्या सर्वाधिक मागणीच्या कालावधीत करण्यासाठी बॅटरी स्टोरेज प्रकल्प उभारण्यात येत आहेत. तसेच सर्वाधिक मागणीच्या वेळी जलविद्युतचा वापर करता यावा, यासाठी पंप स्टोरेज प्रकल्पांवर भर देण्यात येत आहे. बॅटरी स्टोरेज, पंप स्टोरेज आणि ग्रीन हायड्रोजन या क्षेत्रात राज्यात आगामी काळात खूप मोठी गुंतवणूक होणार आहे.


निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६